

# रेशिमगाणी

साहित्य प्रतिष्ठान®

# रेशिमगाणी

ई साहित्य प्रतिष्ठान

रेशिमगाणी

संकलन : सुनिल सामंत

9869674820

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

©ई साहित्य प्रतिष्ठान®

या संग्रहातील सर्व कवितांचे हक्क त्या त्या गीतकाराच्या/वारसाच्या नांवे आहेत. ही गाणी सादर करण्यापुर्वी त्यांचेशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

हे पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े विनामूल्य वितरित केले जात आहे. हे ई पुस्तक आपण आपल्या ओळखीच्या लोकांना फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक इतर कोणत्याही स्वरूपात सादर करणे, किंवा वेबसाईटवर ठेवायचे असल्यास ई साहित्य प्रतिष्ठानची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

## ... आणि थोडी ओली पाने

शाळेत खूप ज्ञान मिळवलं, गणितं शिकलो. निरनिराळी शास्त्रं शिकलो. परक्या भाषा शिकलो. पण आयुष्यात अशा वेळा येतात... ज्या कोणत्याही निबंधात लिहिता आल्या नाहीत किंवा शास्त्रात मांडता आल्या नाहीत. अशा भावना. अशी उचंबळ. अशी अवस्था. त्यांना नांव देता येत नाही. त्यांचं वर्णन करता येत नाही. वर्णन करायला गेलं की भुसा भरलेल्या प्राण्यात आणि जिवंत प्राण्यात जो फ़रक असतो तसा फ़रक त्या वर्णनात आणि त्या मनःस्थितीत असतो. अशी संध्याकाळ, जिला शब्दांच्या चिमटीत पकडता येत नाही. असं रूप जे दुसऱ्याकडे मांडताच येत नाही. असा अनुभव, ज्याचा चटका थर्मामिटरवर मोजता येत नाही.

अशा वेळी मायबोलीतलं गाणं कानी रुंजी घालतं. अंगभर थर थर थर नाचरा... गारवा जाणवतो. “अंगणात गमले मजला संपले बालपण...” हा अनुभव हाडाहाडात जाणवतो. “चांदण्याचा गंध आला पौर्णिमेच्या रात्री...” म्हणताना सुगंध नाकाशी दरवळतो. “तिन्ही सांजा सखे मिळाल्या...” ऐकताना जीव चुटपुटतो. “फुलले रे क्षण माझे...” म्हणताना हृदय पैंजण होतं. “पाउल थकले, माथ्यावरचे जड झाले ओझे...” या

शब्दांतून घायाळ हताशा पोखरत जाते. “मन नाजुकशी मोतीमाळ...” म्हणताना मनाची नाजुक नाजुक कावरी बावरी अवस्था होते. त्या त्या अनुभवांना, त्या क्षणांना जिवंतपण लाभतं. त्याचा चटका पुन्हा पुन्हा अनुभवाला येतो. पुन्हा पुन्हा डोळे ओलावून येतात. खोलवर ... आतमध्ये... पेशीपेशीत ती वेदना जाणवते.

या गाण्यांचे गीतकार, संगीतकार, गायक, वादक यांना भले खूप नाव मिळाले, सन्मान मिळाला (असेल किंवा नसेलही... काही काही तर गुमनामीतच जगले असतील...) पण त्यांनी आपल्याला जे दिलं त्याचं मोल करणं शक्य नाही. अंगावर फ़ुललेला रोमांच, मनात फ़ुल्लेला ताटवा किंवा छातीत उभारलेला आत्मविश्वास यांचं मोल कोण आणि कसं करणार? त्यांनी मला, माझ्या अव्यक्त भावनांना शब्द दिले. एखाद्या मित्रासारखे वेळेला उभे राहिले. स्पर्श केला. गंध दिला. आयुष्य या गाण्यांशिवाय एक गणित झालं असतं. किंवा एक निबंध. वर एक शिर्षक. शेवटी एक पूर्ण विराम. दहा पैकी दहा मिळाले असतेही. पण जगणे मात्र एखाद्या जनावरासारखे झाले असते.

पण तसं झालं नाही. आपल्या पूर्वजांनी भाषा तयार केल्या. पक्ष्यांकडून गाणं घेतलं. आपल्या मनातल्या भावना प्रतिबिंबित करणारी गाणी निर्माण केली. आणि

आपल्याला बहाल केली. बरेचदा त्या गाण्यातले सूर इतके सुंदर होते की शब्दांकडे लक्षच गेलं नाही. अनवट शब्दांचे अर्थ शोधण्याच्या भरीला पाडलं नाही.

मागे वळून पाहिल्यावर जाणवतं. मराठीतल्या गीतकारांनी किती मौल्यवान संपत्ती निर्माण केली आणि उधळली आपल्यावर. एकेका ओळीत किती किती गहन अर्थ. किती समजूत. किती गोडवा. थोडा वेळ सूर बाजूला ठेवून निव्वळ शब्दांचं रसपान करावं. आणि त्या शुद्ध भावाला झिरपू द्यावं. अर्थात असं होत नाही. शब्द वाचता वाचता सूर कानात गुंजन करत रहातातच. ताल हृदयाला ठेका देतोच. तरीही नुसते शब्द वाचण्याची एक खास मजा असतेच. जुना मित्र भेटल्यासारखं वाटतं.

ही गाणी रेशमी आहेत. तलम. मुठीत मावेल अशी साडी बनायची म्हणे पुर्वी. तसा आयुष्यभराचा अनुभव या गाण्यांच्या दोन ओळींत मावतो. आयुष्यभराला पुरेल इतकं शहाणपण देतात यातल्या दोन ओळी. पण जीन्सच्या जमान्यात रेशमाचं काम काय? कपाटात देखावा म्हणून ठेवण्यासाठी ठीक आहेत. वाईट वाटतं. हा अमूल्य ठेवा आहे. ताजमहालासारखा मिरवावा असा.  अफ़ाट. सुंदर. रेशमी. सुगंधी.

मराठीत नाही म्हटलं तरी पन्नास एक हजार गाणी असतील. त्यातली जनप्रिय गाणीही हजारो. त्यातली शब्दप्रधान गाणी, ज्यांच्यात काव्याची खास चमक आहे अशी गाणी निवडली. तरीही हा संग्रह बघता बघता खुप मोठा झालाय. त्यामुळे

त्यातून चार भाग करायचे ठरवले. हा पहिला. दुसरा भक्तीप्रधान, तिसरा सामाजिक आणि राष्ट्रीय, आणि चवथा मराठी लोकगीतांचा. ते याच वर्षात येतील.

हा संग्रह बनवताना अनेक ठिकाणाहून उसनवारी केली आहे. पण त्यातील सर्वात मोठा खजिना मिळाला तो “आठवणीतील गाणी” या वेबसाईटवर. अलका विभास यांनी एकट्याच्या बळावर बनवलेली ही वेबसाईट. वेड याखेरीज ज्याचं वर्णन करताच येणार नाही अशी ही गोष्ट. अलकाताईंनी अकरा वर्षं अथक मेहनत घेऊन सुमारे तीन हजार गाण्यांचा खजिना जमा करून विनामूल्य, कसल्याही परतफ़ेडीची अपेक्षा न ठेवता मराठी लोकांसाठी खुला करून दिला आहे. मराठी गाण्यांची विशेष आवड असणाऱ्यांसाठी www.aathavanitli-gani.com ही एक परिपूर्ण रेफ़रंस साईट आहे. अलकाताईंसारख्या व्यक्ती आणि अशाच काही संस्थांमुळे मराठीची पताका कायम डौलाने फ़डकत राहील याचा विश्वास वाटतो.

तमिळ भाषेतील महाकवी असे ज्यांना म्हणतात ते सुब्रमण्यम भारती. त्यांची एक सुप्रसिद्ध कविता आहे ज्यात त्यांनी भारताच्या विविध प्रांतांचं वर्णन केलेलं आहे. त्यात महाराष्ट्राचं वर्णन “कोमल कविता आणि रांगड्या लढवय्यांचा” देश असं केलं आहे. बंगालचे गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांनी गीतांजली लिहिण्यापुर्वी संत

तुकारामाच्या गाथेचं बंगाली भाषांतर केलं होतं. आणि त्याच प्रभावाखाली त्यांनी गीतांजली लिहीली.

हे सगळं ऐकताना दोन गोष्टी जाणवतात. पहिली ही की आपण किती किती श्रीमंत आहोत. किती मोठ्या इस्टेटीचे मालक आहोत. मराठी म्हणजे एक मोठ्ठा राजवाडाच. किती मोठी दालनं! कसलं भारी फ़र्निचर! किती भव्य इंटेरिअर. कसले गालिचे! कसली भारी तावदानं! किती सुंदर बाग बगीचे. कारंजी. गाद्या गिर्द्या... अबब! दुनियेतले सर्वात श्रीमंत पेशवे ते आपणच. या भावनेने अभिमानाने ऊर भरून येते. मान ताठ होते. खांदे गर्वाने वर होतात.

पुढच्याच क्षणी दुसरी जाणीव जागी होते... किती करंटे आपण. आपल्यानंतर या वाड्यात, या गाद्या गिरद्यांवर कोणी लोळणार की नाही हे ही माहिती नाही. कोणी पाऊल टाकील की नाही या अलिबाबाच्या गुहेत? की सगळे त्या साता समुद्रापारच्या श्रीमंत राणीच्या वैभवात मग्न होणार? खेडेगांवातली गरीब मुलं श्रीमंतांच्या वाड्यावर रोषणाई बघायला धावतात तसं आपल्या पुढच्या पिढ्या तिकडच्या रोषणाईला भुलणार का? एखादा भुईनळा आपल्या हाताने लावायला मिळाला यातच धन्य मानणार का? कधी तरी टुरिस्ट म्हणून आपले आजोबा कसल्या घरात रहायचे ते बघायला म्हणून

येतीलही. एखादं गाणं ऐकतीलही. पण त्यांना या ओल्या पानांचा वास कळण्याची शक्यता नाही. या भावनेने छातीत कळ उठते. मान शरमेने खाली जाते.

खंत हीच... की आम्ही, आमच्याच पिढीने हे घडवून आणलंय ना... दोष द्यायला समोर फ़ार तर आरसा आहे. तेव्हा...

“मम म्हणताना आता हसतो थोडे
मिटून घेतो वस्तुस्थितीचे डोळे...”

सुनिल सामंत

# फिटे अंधाराचे जाळे

सुधीर मोघे

फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश
दरीखोऱ्यांतून वाहे एक प्रकाश प्रकाश

रान जागे झाले सारे पायवाटा जाग्या झाल्या
सूर्य जन्मता डोंगरी संगे जागल्या सावल्या
एक अनोखे लावण्य आले भरास भरास

दंव पिऊन नवेली झाली गवताची पाती
गाणी जुनीच नव्याने आली पाखरांच्या ओठी
क्षणापूर्वीचे पालटे जग उदास उदास

झाला आजचा प्रकाश जुना कालचा काळोख
चांदण्याला किरणांचा सोनसळी अभिषेक
सारे रोजचे तरीही नवा सुवास सुवास

साऱ्या रंगावर आली एक सोनेरीशी झाक
भिडे काळजाला थेट निळ्या क्षितिजाची हाक
तुझ्या नसण्याची कळ गेली तळास तळास

"तुझ्या नसण्याची कळ गेली तळास तळास..." हे पुस्तक बनवत असतानाच मोघे सरांच्या निधनाची दुःखद बातमी आली. त्यांना ई साहित्य टीम तर्फे विनम्र श्रद्धांजली

# प्रथम तुज पाहता

ग. दि. माडगूळकर

प्रथम तुज पाहता जीव वेडावला
उचलुनी घेतले निज रथी मी तुला

स्पर्श होता तुझा विसरलो भान मी
धुंद श्वासातला प्राशिला गंध मी
नयन का देहही मिटुनी तू घेतला

जाग धुंदीतुनी मजसी ये जेधवा
कवळुनी तुजसी मी चुंबिले तेधवा
धावता रथ पथी पळभरी थांबला

"त्या" क्षणाचं केवढं हे सुंदर वर्णन. "धावता रथ ..." ...त्या क्षणाला सर्व विश्वच थांबल्याचा अनुभव.

# ये रे घना, ये रे घना

आरती प्रभू

ये रे घना, ये रे घना
न्हाउ घाल माझ्या मना

फुले माझी अळुमाळु, वारा बघे चुरगळू
नको नको म्हणताना गंध गेला रानावना

टाकुनिया घरदार नाचणार, नाचणार
नको नको म्हणताना मनमोर भर राना

नको नको किती म्हणू, वाजणार दूर वेणु
बोलावतो सोसाट्याचा वारा मला रसपाना

अळुमाळु, मनमोर...
चिंत्र्यंचे खास अनवट शब्द..

# शुक्रतारा मंद वारा

मंगेश पाडगावकर

शुक्रतारा, मंद वारा, चांदणे पाण्यातुनी
चंद्र आहे, स्वप्न वाहे धुंद या गाण्यातुनी
आज तू डोळ्यांत माझ्या मिसळुनी डोळे पहा
तू अशी जवळी रहा

मी कशी शब्दांत सांगू भावना माझ्या तुला ?
तू तुझ्या समजून घे रे लाजणाऱ्या या फुला
अंतरीचा गंध माझ्या आज तू पवना वहा
तू असा जवळी रहा

लाजऱ्या माझ्या फुला रे गंध हा बिलगे जिवा
अंतरीच्या स्पंदनाने अन् थरारे ही हवा
भारलेल्या या स्वरांनी भारलेला जन्म हा
तू अशी जवळी रहा

शोधिले स्वप्नात मी ते ये करी जागेपणी
दाटुनी आलास तू रे आज माझ्या लोचनी
वाकला फांदीपरी आता फुलांनी जीव हा
तू असा जवळी रहा

# आज अचानक गाठ पडे

आ. रा. देशपांडे 'अनिल'

आज अचानक गाठ पडे
भलत्या वेळी भलत्या मेळी
असता मन भलतीचकडे

नयन वळविता सहज कुठेतरी
एकाएकी तूच पुढे

दचकुनि जागत जीव नीजेतच
क्षणभर अंतरपट उघडे

गूढ खूण तव कळून ना  कळून
भांबावुन मागे मुरडे

निसटुनि जाई संधीचा क्षण
सदा असा संकोच नडे

फ़्लॅशबॅक : अंतरपट...
या इवल्याशा गाण्यात एक सिनेमाच ठासून भरलेला आहे. सीन बाय सीन. नीट वाचा..

# खेळताना रंग बाई होळीचा

यादवराव रोकडे

खेळताना रंग बाई होळीचा होळीचा
फाटला ग कोना माझ्या चोळीचा

आम्ही तरण्या ग पोरी
जमलो गावा बाहेरी
सख्याची आली स्वारी
उडविली ती पिचकारी
घातला ग घेरा त्यानं टोळीचा, टोळीचा
फाटला ग कोना माझ्या चोळीचा

झणि पाऊल अवघडलं
आणि काळीज धडधडलं
काय सांगु मी पुढलं
क्षणातच सारं घडलं
जीव झाला घाबरा भोळीचा, भोळीचा
फाटला ग कोना माझ्या चोळीचा

मला काहि समजंना
मला काही उमजंना
त्याला कोणी सांगंना
कुणाला तो ऐकंना
डाव साधला ऐनवेळीचा, वेळीचा
फाटला ग कोना माझ्या चोळीचा

# ग बाई बाई झोंबतो गारवा

जगदीश खेबूडकर

चंदनाच्या पलंगी शेज मखमली लाल
दोन उशा रेशमी, गरम लोकरी शाल
पर झोप नाही आली जागरण झालं काल
रंग महाली ऊब असून का
काटा फुलतोय नवा
ग बाई बाई झोंबतो गारवा !

अंग नाजूक ग मला रुतली उशी
आली जांभई ग निजले बदलून कुशी
खिडकीमधुनी खुणवत होता
चवथीचा चांदवा
ग बाई बाई झोंबतो गारवा !

रागारागानं गेले मी कोन्यात ग
चिंब न्हाऊन मी पाहिलं ऐन्यात ग
मनात माझ्या घुमु लागला मदनाचा पारवा
ग बाई बाई झोंबतो गारवा !

आज आला तुम्ही माझी केली कदर
झाली नजरानजर घेते लाजून पदर
खुशाल यावं जवळ घ्यावं धरून हात आडवा
ग बाई बाई झोंबतो गारवा !

# रजनिनाथ हा नभीं उगवला ।

गोविंद बल्लाळ देवल

रजनिनाथ हा नभीं उगवला
राजपथीं जणुं दीपचि गमला ॥

नवयुवतीच्या निटिलासम किति ।
विमल दिसे हा ग्रहगण भोंवतीं ।
शुभ्रकिरण घन तिमिरीं पडती ।
पंकीं जेविं पयाच्या धारा ॥

निटिल : कपाळ

विमल : स्वच्छ

पंकी : चिखलात

पय : पाणी

कल्पनाविलासाची कमाल म्हणता येईल अशी कविता

# राजाच्या रंगम्हाली

योगेश

राजाच्या रंगम्हाली सोन्याचा बाई पलंग
रूप्याचं खांब त्येला मोत्याची झालर
राजाच्या रंगम्हाली पराची मऊ गादी
जरीचा चांदवा रेशमी शिणगार
गडनी, सजनी, गडनी सजनी ग

राजाच्या रंगम्हाली रानी ती रुसली
बोलं ना, हसं ना, उदास नजर
राजाच्या रंगम्हाली राजानं पुशिलं
डोळ्यांची कमळं उघडा व्हटांची डाळिंबं
गडनी, सजनी, गडनी सजनी ग

राजाच्या रंगम्हाली रानी वो सांगिते
सुना सोन्याईन म्हाल कशाला बडिवार
मायेच्या पूतापायी रानी ग रडीते
आसवांची गंगा व्हाते भिजीला पदोर
गडनी, सजनी, गडनी सजनी ग

सौंदर्य, वैभव असतानाही
राणी का बरं रडते?

# जिवलगा राहिले रे दूर

शांता शेळके

जिवलगा, राहिले रे दूर घर माझे !
पाउल थकले, माथ्यावरचे जड झाले ओझे

किर्र बोलते घन वनराई
सांज सभोंती दाटुन येई
सुखसुमनांची सरली माया, पाचोळा वाजे

गाव मागचा मागे पडला
पायतळी पथ तिमिरी बुडला
ही घटकेची सुटे सराई, मिटले दरवाजे

निराधार मी, मी वनवासी
घेशिल केव्हा मज हृदयासी ?
तूच एकला नाथ अनाथा, महिमा तव गाजे

मन विषण्ण करणारा एक एक वेचक शब्द. आणि निराश मनाचं चित्र उभं करणारं शांताबाईंचं अजरामर गीत. जड झाले ओझे, पाचोळा वाजे, सुटे सराई, मी वनवासी, मागे पडला अशा शब्दांतून असहाय्यतेची पराकोटी उभी केली आहे. साधे सुधेच शब्द. पण गहन गंभीर चित्र उभं केलंय.

# रात्र आहे पौर्णिमेची

शांताराम नांदगावकर

रात्र आहे पौर्णिमेची, तू जरा येऊन जा
जाणिवा थकल्या जीवाच्या एकदा ऐकून जा

निथळला तो भाव सारा वितळल्या चंद्रातुनी
मिसळल्या मृदु भावनाही झोपल्या पानांतुनी
जागती नेत्रांतली ही पाखरे पाहून जा

पाखरे पाहून जा, जी वाढली पंखाविना
सूर कंठातील त्यांच्या जाहला आता जुना
त्या पुराण्या गीतिकेचा अर्थ तू ऐकून जा

अर्थ तू ऐकून जा, फुलवील जो वैराणही
रंग तो पाहून जा, जो तोषवी अंधासही
ओंजळीच्या पाकळ्यांचा स्पर्श तू घेऊन जा

वितळला चंद्र, वाढली पंखांविना, यातून एक गोष्ट तयार होते..

# बुगडि माझी सांडलि ग

ग. दि. माडगूळकर

बुगडि माझी सांडलि ग
जाता साताऱ्याला ग जाता साताऱ्याला
चुगलि नगा सांगू ग
माझ्या म्हाताऱ्याला ग माझ्या म्हाताऱ्याला !

माझ्या शेजारी तरूण राहतो
टकमक टकमक मला तो पाहतो
कधि खुणेने जवळ बाहतो
कधि नाही ते भुलले ग बाई,
त्याच्या इशाऱ्याला, त्याच्या इशाऱ्याला !

आज अचानक घरी तो आला
पैरण, फेटा नि पाठीस शेमला
फार गोड तो मजसी गमला
दिला बसाया पाट मी बाई,
त्याला शेजाऱ्याला, माझ्या शेजाऱ्याला !

घरात नव्हते तेव्हा बाबा
माझा मजवर कुठला ताबा
त्याची धिटाई तोबा तोबा !
वितळु लागे ग लोणी बाई,
बघता निखाऱ्याला, बघता निखाऱ्याला !

त्याने आणिली अपुली गाडी
तयार जुंपून खिलार जोडी
मीहि ल्याले ग पिवळी साडी
वेड्यावाणी जोडीने ग गेलो,
आम्ही बाजाराला, आम्ही बाजाराला !

येण्याआधी बाबा परतून
पोचणार मी घरात जाउन
मग पुसतील काना पाहून
काय तेव्हा सांगू मी ग बाई,
त्याला बिचाऱ्याला, त्याला बिचाऱ्याला !

# राधे तुझा सैल अंबाडा

मनमोहन नातू

कसा ग गडे झाला ? कुणी ग बाई केला ?
राधे, तुझा सैल अंबाडा !

पृथ्वीच्या पेल्यात गाळिली, रजनीच्या बागेतिल द्राक्षे
भुलवुनि तुजला वनात नेली, रसरसलेली रात्र रंगली
वाजविता बासरी,
कचपाशांचा नाग उलगडी फडा !

पहिल्या चंचल भेटीमधली, बाल्याची कबुतरे पळाली
वेणी तिपेडी कुरळी मृदुला, सुटली घालित गंध-सडा !

भ्रमर रंगी हा श्याम सापडे, नीलकमल कचपाशि तव गडे
अरुणोदय होताच उलगडे, पाकळी पाकळी होइ मोकळी
या कोड्याचा झाला उलगडा !

# आज कुणीतरी यावे

ग. दि. माडगूळकर

आज कुणीतरी यावे, ओळखिचे व्हावे

जशी अचानक या धरणीवर
गर्जत आली वळवाची सर, तसे तयाने गावे

विचारल्याविण हेतू कळावा
त्याचा माझा स्नेह जुळवा, हाती हात धरावे

सोडुनिया घर, नाती-गोती
निघून जावे तया संगती, कुठे तेही ना ठावे

विचारल्याविण हेतू कळावा !!!.

# बांधले मी बांधले इंद्राचे तोरण

इंदिरा संत

बांधले मी बांधले, इंद्राचे तोरण बांधले
शिंपण घातले, चाफ्याचे शिंपण घातले

उन्हाचे पाटव नेसले, टाकले
वाऱ्याचे पैंजण घातले, फेकले
डोळ्यांत काजळ, केवडा, अत्तर
लावले, पुसले

हर्षाचे हिंदोळे सोडले, बांधले
मयूर मनाचे रुसले, हासले
हिंदोळे हर्षाचे, मयूर मनाचे
हासले, नाचले

दिसला, लपला, चकोर मनाचा
फुलला, ढळला, बहर चंद्राचा
लामण सूऱ्याचा, श्रावण नेत्राचा
विझले, तेवले

उन्हाचे पाटव, वाऱ्याचे पैंजण, हर्षाचे हिंदोळे, मयूर मन, मनाचा चकोर, नेत्राचा श्रावण... किती किती प्रतिमा....

# या सुखांनो या

ग. दि. माडगूळकर

या सुखांनो या
एकटी पथ चालले, दोघांस आता हात द्या, साथ द्या

विरहांतीचा एकांत व्हा, अधीर व्हा आलिंगने
गाली-ओठी व्हा सुखांनो भाववेडी चुंबने
होउनी स्वर वेळूचे वार्‍यासवे दिनरात या, गात या

आमुच्या बागेत व्हा लडिवाळ तुम्ही पाखरे
शयनघरच्या या छताची व्हा रुपेरी झुंबरे
होऊ द्या घर नांदते तुम्हीच त्यांना घास द्या, हात द्या

अंगणी प्राजक्त व्हा, सौधावरी व्हा चांदणे
जोडप्याचे गूज जुईचे चिमुकल्यांचे रांगणे
यौवनी सहजीवनी, दोन्ही मनांचे गीत व्हा, प्रीत व्हा

# डाव मांडून भांडून

ना. घ. देशपांडे

डाव मांडून भांडून मोडू नको डाव मोडू नको

आणले तू तुझे सर्व, मी आणले
सर्व काही मनासारखे मांडले
तूच सारे तुझे दूर ओढू नको

सोडले मी तुझ्याभोवती सर्व गे
चंद्र ज्योतीरसाचे रुपेरी फुगे
फुंकरीने फुगा, हाय, फोडू नको

'गोकुळीचा सखा' तूच केले मला
कौतुकाने मला हार तू घातला
हार हासून घालून तोडू नको

काढले मी तुझे नाव, तू देखिले
आणि माझे पुढे नाव तू रेखिले
तूच वाचून, लाजून, खोडू नको

# राधा गौळण करिते

पी. सावळाराम

राधा गौळण करिते मंथन
आविरत हरिचे मनात चिंतन

सुवर्ण चंपक यौवन कांती
हिंदोलत ती मागे पुढती
उजव्या डाव्या झुलत्या हाती
कृष्ण कृष्ण ते बोलत कंकण

नाद मुरलीचा पडता कानी
बावरली ती गोकुळ हरिणी
छुमछुम छंदी घुंगूर चरणी
गुणगोविंदी गेली रंगून

राधेविण ते मंथन चाले
नवल बघाया नवनित आले
ध्यान तियेचे उघडी डोळे
दृष्टी पुढती देवकीनंदन

घुसळण होताना लोणी (नवनित) बाहेर का आले?

# फुलले रे क्षण माझे

नितीन आखवे

फुलले रे क्षण माझे फुलले रे
मेंदीने, शकुनाच्या.. शकुनाच्या मेंदीने
सजले रे क्षण माझे सजले रे

झुळूक वाऱ्याची आली रे लेऊन कोवळी सोनफुले
साजण स्पर्शाची जाणिव होऊन, भाळले मन खुळे
या वेडाचे, या वेडाचे, नाचरे भाव बिलोरे
मेंदीने.. शकुनाच्या मेंदीने
खुलले रे क्षण माझे खुलले रे

ओढ ही बेबंद, श्वासात, ध्यासात, स्वप्नात येणे तुझे
भांबावल्या माझ्या ऊरात, स्पर्शात, रेशिम काटे तुझे
मनमोराचे, मनमोराचे, जादुभरे हे पिसारे
मेंदीने.. शकुनाच्या मेंदीने
हसले रे क्षण माझे हसले रे

रीत ही, प्रीत ही उमजेना
जडला का जीव हा समजेना
कशी सांगू मी, कशी सांगू मी
माझ्या मनीची कथा रे
मेंदीने.. शकुनाच्या मेंदीने
भुलले रे क्षण माझे भुलले रे

# राहिले रे अजून श्वास किती

सुरेश भट

राहिले रे अजून श्वास किती
जीवना, ही तुझी मिजास किती

आजची रात खिन्न ताऱ्यांची
आजचा चंद्रही उदास किती

मी कसे शब्द थोपवू माझे ?
हिंडती सूर आसपास किती

दु:ख माझे... विरंगुळा त्यांचा
मी करावे खुळे कयास किती

ओळखीचे कुणीतरी गेले...
ओळखीचा इथे सुवास किती

हे कसे प्रेम? या कशा आशा ?
मी जपावे अजून भास किती ?

सोबतीला जरी तुझी छाया...
मी करू पांगळा प्रवास किती ?

# अजुनी रुसूनी आहे

आ. रा. देशपांडे 'अनिल'

अजुनी रुसूनी आहे, खुलता कळी खुले ना
मिटले तसेच ओठ की पाकळी हले ना !

समजूत मी करावी म्हणुनीच तू रुसावे
मी हास सांगताच रडताही तू हसावे
ते आज का नसावे? समजावणी पटे ना
धरिला असा अबोला की बोल बोलवेना !

की गूढ काही डाव वरचा न हा तरंग
घेण्यास खोल ठाव, बघण्यास अंतरंग ?
रुसवा असा कसा हा ज्या आपले कळेना ?
अजुनी रुसूनी आहे, खुलता कळी खुले ना !

पत्नीविरहानंतरची कवी अनिल यांची ही कविता. मुळातच सोनं. कुमारांनी त्याचा दागिना केला.

# टप् टप् पडती अंगावरती

मंगेश पाडगावकर

टप् टप् पडती अंगावरती प्राजक्ताची फुले
भिर् भिर् भिर् भिर् त्या तालावरती गाणे अमुचे जुळे !

कुरणावरती, झाडांखाली
ऊन-सावली विणते जाळी
येतो वारा पाहा भरारा, गवत खुशीने डुले !

दूर दूर हे सूर वाहती
उन्हात पिवळ्या पहा नाहती
हसते धरती, फांदीवरती हा झोपाळा झुले !

गाणे अमुचे झुळ-झुळ वारा
गाणे अमुचे लुक-लुक तारा
पाऊस, वारा, मोरपिसारा या गाण्यातुन फुले !

फुलांसारखे सर्व फुला रे
सुरात मिसळुनि सूर, चला रे
गाणे गाती तेच शहाणे बाकी सारे खुळे !

# राया चला घोड्यावरती

वसंत सबनीस

रात अशी बहरात राजसा, तुम्ही नका ना रुसू
अहो राया चला घोड्यावरती बसू !

नवा देखणा आणा घोडा
जिन कसुनी लगाम जोडा
झुलती रिकीब खाली सोडा
उगा वाटतं खूप फिरावं
नकाच काही पुसू
अहो राया चला घोड्यावरती बसू

नेशिन साडी नव्या घडीची
गर्भ रेशमी लाल खडीची
चोळी घालीन वर ऐन्याची
निळ्या मोकळ्या आभाळावर
चंद्र लागला दिसू
अहो राया चला घोड्यावरती बसू

मंदील चढवा बांधा शेला
उचलून घ्या ना पुढ्यात मजला
हलक्या हाताने विळखा घाला
मिठीत येईल पुनव नभीची
कसलं आलं हसू
अहो राया चला घोड्यावरती बसू

# डार्लिंग डार्लिंग काय म्हनतोस

राम मोरे

डार्लिंग डार्लिंग काय म्हनतोस ?
भलताच बाईल येडा दिसतोस !

रूप बावळं झिपरं केस
हिप्पीवानी सारा वेष
घर ना दार भुईला भार
घरावर चकरा काय मारतोस ?

दारु-मटक्याचा नाद तुला
चोरीचीही ठाव कला
पत्त्याचा इमला तुला ना जमला
महालाची बात आता काय करतोस ?

नार मी मोठ्या घरची रं
बापही माझा पाटील रं
साधुन मोका मारतोस धक्का
हातात इस्तव काय धरतोस ?

# केळीचे सुकले बाग

आ. रा. देशपांडे 'अनिल'

केळीचे सुकले बाग असुनिया पाणी
कोमेजली कवळी पानं असुनि निगराणी

अशी कुठे लागली आग जळती जसे वारे
कुठे तरी पेटला वणवा, भडके बन सारे

किती दूरची लागे झळ आंतल्या जिवा
गाभ्यातील जीवनरस, सुकत ओलावा

किती जरी घातले पाणी, सावली केली
केळीचे सुकले प्राण बघुनि भवताली

# प्रेमा काय देऊ तुला

पी. सावळाराम

प्रेमा, काय देऊ तुला ?
भाग्य दिले तू मला

प्रीतिच्या या पाखराचे रत्नकांचनी पंख देऊ का
देऊ तुला का हर्षगंध हा जीव फुलातून मोहरलेला

या हृदयीच्या जलवंतीची निळी ओढ ती तुला हवी का
रूप मोहिनी लावण्याची हवी तुझ्या का चंद्रकलेला

मोहक सुंदर जे जे दिसते, तूच तयांचा जन्मदाता
घेशील का रे माझ्याकरिता अधरीच्या या अमृताला

# ठाऊक नाही मज काही

मधुसूदन कालेलकर

ठाऊक नाही मज काही !
ठाऊक आहे का तुज काही, कशी होती रे माझी आई ?

मऊ जशी ती साय दुधाची होती आई का तशी मायेची ?
बागेतील ते कमल मनोहर आई होती का तशीच सुंदर ?
देवाघरी का एकटी जाई ?
ठाऊक आहे का तुज काही, कशी होती रे माझी आई ?

चिउकाऊची कथा चिमुकली सांगत होती का ती सगळी ?
अम्हांसारखे शुभंकरोती म्हणे रोज का देवापुढती ?
गात असे का ती अंगाई ?
ठाऊक आहे का तुज काही, कशी होती रे माझी आई ?

मऊ साइहून आई प्रेमळ ! गंगेहून ती आहे निर्मळ
अमृताचे घास भरविते आभाळापरी माया करीते
आईवाचून मीही विरही
ठाऊक आहे का तुज काही, कशी होती रे माझी आई ?

# अखेरचे येतिल माझ्या

मंगेश पाडगावकर

अखेरचे येतिल माझ्या हेच शब्द ओठी
लाख चुका असतिल केल्या, केली पण प्रीती

इथे सुरू होण्याआधी संपते कहाणी
साक्षीला केवळ उरते डोळ्यांतिल पाणी
जखम उरी होते ज्यांच्या तेच गीत गाती

सर्व बंध तोडुनि जेव्हा नदी धुंद धावे
मीलन वा मरण पुढे हे तिला नसे ठावे
एकदाच आभाळाला अशी भिडे माती

गंध दूर ज्याचा आणिक जवळ मात्र काटे
असे फूल प्रीती म्हणजे कधी हाय वाटे
तरी गंध धुंदित धावे जीव तुझ्यासाठी

आर्त गीत आले जर हे कधी तुझ्या कानी
गूज अंतरीचे कथिले तुला या स्वरांनी
डोळ्यांतुन माझ्यासाठी लाव दोन ज्योती

साक्षीला केवळ उरते !!!

या गीताची प्रत्येक ओळ म्हणजे एक एक दागिनाच आहे. मनाला चुटपुट लावणारे गाणे

# गंध फ़ुलांचा गेला सांगून

पी. सावळाराम

गंध फुलांचा गेला सांगून
तुझे नि माझे व्हावे मीलन, व्हावे मीलन

सहज एकदा जाता जाता मिळुनि हसल्या अपुल्या नजरा
दो हृदयांच्या रेशीमगाठी प्रीत भावना गेली बांधून

विरह संपता, मीलनाची अमृतगोडी चाखीत असता
सखया अवचित जवळी येता ढळे पापणी गेले लाजून

मनामनांच्या हर्षकळ्यांची आज गुलाबी फुले जाहली
वरमाला ही त्याच फुलांची गुंफून सखया तुलाच वाहीन

# परीकथेतिल राजकुमारा

वंदना विटणकर

परीकथेतिल राजकुमारा
स्वप्नी माझ्या येशिल का ?
भाव दाटले मनी अनामिक,
साद तयांना देशिल का ?

या डोळ्यांचे गूढ इषारे
शब्दांवाचुन जाणुन सारे
'राणी अपुली' मला म्हणोनी,
तुझियासंगे नेशिल का ?

लाजुन डोळे लवविन खाली
नवख्या गाली येइल लाली
फुलापरी ही तनू कापरी,
हृदयापाशी घेशील का ?

मूर्त मनोरम मनी रेखिली
दिवसा रात्री नित्य देखिली
त्या रूपाची साक्ष जिवाला,
प्रत्यक्षातुन देशिल का ?

लाजबावरी मिटुन पापणी
साठवीन ते चित्र लोचनी
नवरंगी त्या चित्रामधले,
स्वप्नच माझे होशील का?

# प्रीतिच्या चांदराती

शांताराम नांदगावकर

प्रीतिच्या चांदराती घेऊनी हात हाती
जोडू अमोल नाती, ये ना,
ये प्रिये !

फुलला हा कुंज सारा, हसली पाने फुले
रुसवा आता कशाला अधरी प्रीती फुले
हासते.... चांदणे !

सरला आता दुरावा, मिटती का लोचने
सखये या मीलनाला नुरले काही उणे
हात दे, साथ दे !

# गाइ पाण्यावर काय

कवि ’बी’

गाइ पाण्यावर काय म्हणुनी आल्या ?
का ग गंगायमुनाहि या मिळाल्या ?
उभय पितरांच्या चित्त-चोरटीला
कोण माझ्या बोलले गोरटीला ?

विभा-विमला आपटे-प्रधानांच्या
अन्य कन्या श्रीमान कुलीनांच्या
गौर चैत्रींची तशा सजूनि येती,
रेशमाची पोलकी छिटे लेती.

तुला 'लंकेच्या पार्वती' समान
पाहुनीया, होवोनि साभिमान
काय त्यातिल बोलली एक कोण
'अहा ! - आली ही पहा - भिकारीण !'

पंकसंपर्के कमळ का भिकारी ?

धूलिसंसर्गे रत्‌न का भिकारी ?
सूत्रसंगे सुमहार का भिकारी ?
कशी तूही मग मजमुळे भिकारी ?

लाट उसळोनी जळी खळे व्हावे,
त्यात चंद्राचे चांदणे पडावे;
तसे गाली हासता तुझ्या व्हावे,
उचंबळुनी लावण्य वर वहावे !

नारि मायेचे रूप हे प्रसिद्ध,
सोस लेण्यांचा त्यास जन्मसिद्ध;
तोच बीजांकुर धरी तुझा हेतू,
विलासाची होशील मोगरी तू !

तुला घेइन पोलके मखमलीचे,
कुडी मोत्यांची, फूल सुवर्णाचे;
हौस बाई ! पुरवीन तुझी सारी,
परि आवरि हा प्रलय महाभारी !

प्राण ज्यांचेवर गुंतले सदाचे,

कोड किंचित् पुरविता न ये त्यांचे;
तदा बापाचे हृदय कसे होते,
नये वदतां, अनुभवी जाणती ते !

देव देतो सद्‌गुणी बालकांना
काय म्हणुनी आम्हास करंट्यांना ?
लांब त्याच्या गावास जाउनीया
गूढ घेतो हे त्यास पुसोनीया !

"गावि जातो," ऐकता त्याच काली
पार पदलुनी ती बालसृष्टि गेली !
गळा घालुनि करपाश रेशमाचा
वदे "येते मी" पोर अज्ञ वाचा !

# घननीळा लडिवाळा

ग. दि. माडगूळकर

घननीळा, लडिवाळा
झुलवु नको हिंदोळा !

सुटली वेणी, केस मोकळे
धूळ उडाली, भरले डोळे
काजळ गाली सहज ओघळे
या साऱ्याचा उद्या गोकुळी
होइल अर्थ निराळा !

सांजवेळ ही, आपण दोघे
अवघे संशय घेण्याजोगे
चंद्र निघे बघ झाडामागे
कलिंदीच्या तटी खेळतो
गोपसुतांचा मेळा !

# घर असावे घरासारखे

विमल लिमये

घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती
इथे असावा प्रेम-जिव्हाळा नकोत नुसती नाती

त्या शब्दांना अर्थ असावा नकोच नुसती वाणी
सूर जुळावे परस्परांचे नकोत नुसती गाणी

त्या अर्थाला अर्थ असावा नकोत नुसती नाणी
अश्रूतुनही प्रीत झरावी नकोच नुसते पाणी

या घरट्यातुन पिल्लू उडावे दिव्य घेऊनि शक्ती
आकांक्षांचे पंख असावे उंबरठ्यावर भक्ती

# गोड गोजरी लाज लाजरी

पी. सावळाराम

गोड गोजरी, लाज लाजरी ताई तू होणार नवरी
फुलाफुलांच्या बांधुन माळा मंडप घाला ग दारी

करकमलांच्या देठावरती चुडा पाचुचा वाजे
हळदीहुनही पिवळा बाले रंग तुला तो साजे
नथणी-बुगडी लाजे,
रूप पाहुनी तुझे, बांधु ताई मणि-मंगळसरी

भरजरीचा शालू नेसुनी झाली ताई आमुची गौरी
लग्न-मंडपी तिच्या समोरी उभी तिकडची स्वारी
अंतरपाट सरे,
शिवा पार्वती वरे, लाडकी ही जाई ताई दुरी

# केव्हा तरी पहाटे

सुरेश भट

केव्हा तरी पहाटे उलटून रात गेली
मिटले चुकून डोळे हरवून रात गेली

सांगू तरी कसे मी वय कोवळे उन्हाचे ?
उसवून श्वास माझा फसवून रात गेली !

उरले उरात काही आवाज चांदण्यांचे
आकाश तारकांचे उचलून रात गेली !

स्मरल्या मला न तेव्हा माझ्याच गीतपंक्ती
मग ओळ शेवटाची सुचवून रात गेली !

# कुण्या गावाचं आलं

जगदीश खेबूडकर

कुण्या गावाचं आलं पाखरू
बसलंय् डौलात न् खुदूखुदू हसतंय् गालात

कसं लबाड खुदूखुदू हसतंय, कसं कसं बघतंय् हं
आपल्याच नादात ग बाई बाई आपल्याच नादात

मान करून जराशी तिरकी, भान हरपून घेतंय् गिरकी
किती इशारा केला तरी बी
आपल्याच तालात न् खुदूखुदू हसतंय् गालात

कशी सुबक टंच बांधणी, ही तरुण तनु देखणी
कशी कामिना चुकून आली
ऐने महालात न् खुदूखुदू हसतंय् गालात

लाल चुटुक डाळिंब फुटं, मऊ व्हटाला पाणी सुटं
ही मदनाची नशा माईना
टपोर डोळ्यांत न् खुदूखुदू हसतंय् गालात

# बाई बाई मन मोराचा

जगदीश खेबूडकर

बाई बाई, मन मोराचा कसा पिसारा फुलला

चिमणी मैना, चिमणा रावा
चिमण्या अंगणी, चिमणा चांदवा
चिमणी जोडी, चिमणी गोडी
चोच लाविते, चिमण्या चाऱ्याला
चिमणं, चिमणं, घरटं बांधलं, चिमण्या मैनेला

शिलेदार घरधनी माझा, थोर मला राजांचा राजा
भोळा भोळा जीव माजा जडला त्याच्या पायाला

रे मनमोरा, रंगपिसारा, अंगी रंगुनि जीव रंगला
गोजिरवानी, मंजुळ गानी, वाजविते बासुरी डाळिंब ओठाला
येडं, येडं, मन येडं झालं, ऐकुन गानाला

# येऊ कशी प्रिया

शांताराम नांदगावकर

येऊ कशी प्रिया, सवे तुझ्या, अशा क्षणांना

सांजसकाळी, कातरवेळी, सागरकाठी, वाळूवरी, सांग ना
कशी प्रिया, सांग ना

काजळकाळी, रात निराळी, मी तर भोळी, येऊ कशी, सांग ना ?
कशी प्रिया, सांग ना

येते तुझ्या सवे, येते? ना ना ना
येऊ कशी प्रिया, सवे तुझ्या, अशा क्षणांना

# जेव्हा तिची नि माझी

मंगेश पाडगावकर

जेव्हा तिची नि माझी चोरून भेट झाली
झाली फुले कळ्यांची, झाडे भरास आली

दूरातल्या दिव्यांचे मणिहार मांडलेले
पाण्यात चांदण्यांचे आभाळ सांडलेले
कैफात काजव्यांची अन् पालखी निघाली

केसांतल्या जुईचा तिमिरास गंध होता
श्वासातल्या लयीचा आवेग अंध होता
वेड्या समर्पणाची वेडी मिठी मिळाली

नव्हतेच शब्द तेव्हा, मौनात अर्थ सारे
स्पर्शात चंद्र होता, स्पर्शात लाख तारे
ओथंबला फुलांनी अवकाश भोवताली

काजव्यांची पालखी..
तिमिरास गंध, मौनात अर्थ, स्पर्शात लाख तारे..
क्या बात है!

# या जन्मावर या जगण्यावर

मंगेश पाडगावकर

या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे

चंचल वारा, या जलधारा, भिजली काळी माती
हिरवे हिरवे प्राण तशी ही रुजून आली पाती
फुले लाजरी बघुन कुणाचे हळवे ओठ स्मरावे

रंगांचा उघडुनिया पंखा सांज कुणी ही केली ?
काळोखाच्या दारावरती नक्षत्रांच्या वेली
सहा ऋतूंचे सहा सोहळे, येथे भान हरावे

बाळाच्या चिमण्या ओठांतुन हाक बोबडी येते
वेलीवरती प्रेम प्रियेचे जन्म फुलांनी घेते
नदीच्या काठी सजणासाठी गाणे गात झुरावे

या ओठांनी चुंबुन घेइन हजारदा ही माती
अनंत मरणे झेलुन घ्यावी इथल्या जगण्यासाठी
इथल्या पिंपळपानावरती अवघे विश्व तरावे

जीवनाची रसरशीत फ़िलॉसॉफ़ी. जगण्यावर मनापासून प्रेम करणारे गीतकार मंगेश पाडगांवकर

# रजनीगंधा जीवनी या

शांताराम नांदगावकर

रजनीगंधा जीवनी या बहरुनी आली
मनमीत आला तिच्या पाऊली

फुलल्या मनाच्या मुक्या पाकळ्या
झुलल्या लता आज प्रीतीतल्या
अशी आली, प्रीती ल्याली, नवी ही कळी

रजनी अशी ही निळीसावळी
किरणांत न्हाली धरा मल्मली
अशा वेळी, प्रिया येई, फुले लाजली

# या झोपडीत माझ्या

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली
ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या ॥१॥

भूमीवरी पडावे, ताऱ्यांकडे पहावे
प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या ॥२॥

पहारे आणि तिजोऱ्या, त्यातूनी होती चोऱ्या
दारास नाही दोऱ्या, या झोपडीत माझ्या ॥३॥

जाता तया महाला, 'मज्जाव' शब्द आला
भीतीती न यावयाला, या झोपडीत माझ्या ॥४॥

महाली मऊ बिछाने, कंदील शामदाने
आम्हा जमीन माने, या झोपडीत माझ्या ॥५॥

येता तरी सुखे या, जाता तरी सुखे जा
कोणावरी न बोजा, या झोपडीत माझ्या ॥६॥

पाहून सौख्य माझे, देवेंद्र तोही लाजे
शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या ॥७॥

'तुकड्या' मती करावी, पायी तुझ्या नमावी
मूर्ति तुझी रहावी, या झोपडीत माझ्या ॥८॥

# काय बाई सांगू

शांता शेळके

काय बाई सांगू ? कसं ग सांगू ?
मलाच माझी वाटे लाज
काही तरी होऊन गेलंय आज !

उगीच फुलुनी आलं फूल
उगिच जिवाला पडली भूल
त्या रंगाचा, त्या गंधाचा
अंगावर मी ल्याले साज
काही तरी होऊन गेलंय आज !

जरी लाजरी, झाले धीट
बघत राहिले त्याला नीट
कुळवंताची पोर कशी मी
!
विसरून गेले रीत-रिवाज ?
काही तरी होऊन गेलंय आज !

सहज बोलले हसले मी
मलाच हरवुन बसले मी
एक अनावर जडली बाधा
नाहि चालला काही इलाज
काही तरी होऊन गेलंय आज

# बाई माझी करंगळी मोडली

ग. दि. माडगूळकर

ऐन दुपारी, यमुनातीरी, खोडी कुणी काढली
बाई माझी करंगळी मोडली

जळी वाकुन मी घट भरताना
कुठुन अचानक आला कान्हा
गुपचुप येऊन पाठीमागुन, माझी वेणी ओढली

समोर ठाके उभा आडवा
हातच धरला माझा उजवा
मीही चिडले, इरेस पडले, वनमाला तोडली

झटापटीत त्या कुठल्या वेळी
करंगळी हो निळसर काळी
का हृषिकेशी मम देहाशी निजकांती जोडली

# या भवनातिल गीत पुराणे

पुरुषोत्तम दारव्हेकर

या भवनातिल गीत पुराणे
मवाळ, हळवे सूर जाऊ द्या, आज येथुनी दूर

भावभक्तिची भावुक गाथा
पराभूत हो नमविल माथा
नवे सूर अन् नवे तराणे
हवा नवा तो नूर
जाऊ द्या दूर जुने ते सूर

# राधा ही बावरी हरीची

अशोक पत्की

रंगात रंग तो श्यामरंग पाहण्या नजर भिरभिरते
ऐकून तान विसरून भान ही वाट कुणाची बघते
त्या सप्तसुरांच्या लाटेवरुनि साद ऐकुनी होई -
राधा ही बावरी, हरीची राधा ही बावरी !

हिरव्याहिरव्या झाडांची पिवळी पाने झुलताना
चिंब चिंब देहावरुनी श्रावणधारा झरताना
हा दरवळणारा गंध मातीचा मनास बिलगून जाई
हा उनाड वारा गूज प्रीतिचे कानी सांगून जाई
त्या सप्तसुरांच्या लाटेवरुनि साद ऐकुनी होई -
राधा ही बावरी, हरीची राधा ही बावरी !

आज इथे या तरुतळी सूर वेणुचे खुणावती
तुजसामोरी जाताना उगा पाऊले घुटमळती
हे स्वप्न असे की सत्य म्हणावे राधा हरखून जाई
हा चंद्र चांदणे ढगा आडुनी प्रेम तयांचे पाही
त्या सप्तसुरांच्या लाटेवरुनि साद ऐकुनी होई -
राधा ही बावरी, हरीची राधा ही बावरी !

# डोळे हे जुलमि गडे

भा. रा. तांबे

डोळे हे जुलमि गडे
रोखुनि मज पाहु नका
जादुगिरी त्यात पुरी
येथ उभे राहु नका

घालु कशी कशिदा मी ?
होति किती सांगु चुका !
बोचे सुई फिरफिरुनी
वेळ सख्या जाय फुका

खळबळ किती होय मनी !
हसतील मज सर्वजणी
येतिल त्या संधि बघुनि
आग उगा लावु नका !

# त्या सावळ्या तनूचे

आत्माराम सावंत

त्या सावळ्या तनूचे
मज लागले पिसे ग
न कळे मनास आता
या आवरू कसे ग !

ये ऐकण्यास जेव्हा
त्याचा सुरेल पावा
चोहीकडे बघे मी
परि ना कुठे दिसे ग !

हलतो तरू-लतांत
हा खोडसाळ वात
आलाच वाटते 'तो'
मी सारखी फसे ग !

खुपते तनूस शेज
क्षणही न येत नीज
डोळ्यांस तो दिसावा
हृदयात जो वसे ग !

# जीवनात ही घडी अशीच

यशवंत देव

जीवनात ही घडी अशीच राहु दे
प्रीतिच्या फुलावरी वसंत नाचु दे

रंगविले मी मनात चित्र देखणे
आवडले वेडीला स्वप्न खेळणे
स्वप्नातिल चांदवा जिवास लाभु दे

हळुच तुला बघण्याचा छंद आगळा
लज्जेचा त्याविण का अर्थ वेगळा
स्पर्षातुन अंग अंग धुंद होऊ दे

पाहु दे असेच तुला नित्य हासता
जाउ दे असाच काळ शब्द झेलता
मीलनात प्रेमगीत धन्य होऊ दे

# भय इथले संपत नाही

ग्रेस

भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते
मी संध्याकाळी गातो तू मला शिकविली गीते

ते झरे चंद्रसजणांचे ती धरती भगवी माया
झाडांशी निजलो आपण झाडांत पुन्हा उगवाया

तो बोल मंद हळवासा आयुष्य स्पर्शुनी गेला
सीतेच्या वनवासातील जणु अंगी राघव शेला

स्तोत्रात इंद्रिये अवघी गुणगुणती दुःख कुणाचे
हे सरता संपत नाही चांदणे तुझ्या स्मरणाचे

# डोळ्यांमधले आसू पुसती

मंगेश पाडगावकर

कधी बहर, कधी शिशिर, परंतू दोन्ही एक बहाणे
डोळ्यांमधले आसू पुसती ओठांवरले गाणे

बहर धुंद वेलीवर यावा
हळुच लाजरा पक्षी गावा
आणि अचानक गळुन पडावी
विखरुन सगळी पाने

भान विसरुनी मिठी जुळावी
पहाट कधि झाली न कळावी
भिन्न दिशांना झुरत फिरावे
नंतर दोन दिवाणे

हळुच फुलाच्या बिलगुनि गाली
नाजुक गाणी कुणी गायिली
आता उरली आर्त विराणी
सूरच केविलवाणे

जुळली हृदये, सूरहि जुळले
तुझे नि माझे गीत तरळले
व्याकुळ डोळे कातरवेळ
स्मरुन आता जाणे

# तो एक राजपुत्र मी

आरती प्रभू

तो एक राजपुत्र, मी मी एक रानफूल
घालीन मी, मी त्याला सहजिच रानभूल

केसात पानजाळी, कंठात रानवेल
तुझी रे तुझी नटून ताई, घालील त्यास माळ

भाऊ रे शूर अती, होईल सेनापती
भाऊ रे भाऊ करून स्वारी, दुष्टास चारील धूळ

होईल बाबा प्रधान, राखील तो इमान
सुखी रे सुखी राज्य सारे चुटकीत तो करील

# दमलेल्या बाबाची ही

संदीप खरे

कोमेजून निजलेली एक परी राणी,
उतरलेले तोंड, डोळां सुकलेले पाणी
रोजचेच आहे सारे काही आज नाही,
माफी कशी मागू पोरी मला तोंड नाही
झोपेतच घेतो तुला आज मी कुशीत,
निजेतच तरी पण येशील खुशीत
सांगायाचे आहे माझ्या सानुल्या फुला..
दमलेल्या बाबाची ही कहाणी तुला !

आटपाट नगरात गर्दी होती भारी,
घामाघूम राजा करी लोकलची वारी
रोज सकाळीस राजा निघताना बोले,
गोष्ट सांगायचे काल राहुनिया गेले
जमलेच नाही काल येणे मला जरी,
आज परी येणार मी वेळेतच घरी
स्वप्नातल्या गावामध्ये मारू मग फेरी,

खऱ्याखुऱ्या परी साठी गोष्टीतली परी
बांधीन मी थकलेल्या हातांचा झुला..
दमलेल्या बाबाची ही कहाणी तुला !

ऑफिसात उशिरा मी असतो बसून,
भंडावले डोके गेले कामात बुडून
तास-तास जातो खालमानेने निघून,
एक-एक दिवा जातो हळूच विझून
अशा वेळी काय सांगू काय काय वाटे,
आठवांसोबत पाणी डोळ्यांतून दाटे
वाटते की उठुनिया तुझ्यापास यावे,
तुझ्यासाठी मीही पुन्हा लहानगे व्हावे
उगाचच रुसावे नी भांडावे तुझ्याशी,
चिमुकले खेळ काही मांडावे तुझ्याशी

उधळत, खिदळत, बोलशील काही,
बघताना भान मला उरणार नाही
हासुनिया उगाचच ओरडेल काही,
दुरूनच आपल्याला बघणारी आई
तरी सुद्धा दोघे जण दंगा मांडू असा,
क्षणा क्षणावर ठेवू खोडकर ठसा

सांगायची आहे माझ्या सानुल्या फुला..
दमलेल्या बाबाची ही कहाणी तुला !

दमल्या पायाने जेव्हा येईल जांभई,
मऊ मऊ दूध-भात भरवेल आई
गोष्ट ऐकायला मग येशील ना अशी,
सावरीच्या उशीहून मऊ माझी कुशी

कुशी माझी सांगत आहे ऐक बाळा काही,
सदोदित जरी का मी तुझ्या पासनाही
जेवू-खाऊ न्हाऊ-माखू घालतो ना तुला,
आई परी वेणीफणी करतो ना तुला
तुझ्यासाठी आईपरी बाबा सुद्धा खुळा,
तो ही कधी गुपचूप रडतो रे बाळा
सांगायची आहे माझ्या सानुल्या फुला..
दमलेल्या बाबाची या कहाणी तुला !

बोळक्यामध्ये लुकलुकलेला तुझा पहिला दात,
आणि पहिल्यांदाच घेतलास जेव्हा तोंडी मऊ भात
आई म्हणण्याआधी सुद्धा म्हणली होतीस बाबा,
रांगत रांगत घेतलास जेव्हा घराचा तू ताबा

लुटूलुटू उभं राहत टाकलंस पाऊल पहिलं,
दूरचं पहात राहिलो फक्त, जवळ पहायचंच राहिलं

असा गेलो आहे बाळा पुरा अडकून,
हल्ली तुला झोपेतच पहातो दुरून
असा कसा बाबा देव लेकराला देतो,
लवकर जातो आणि उशिरानं येतो
बालपण गेले तुझे गुज निसटून,
उरे काय तुझ्या-माझ्या ओंजळी मधून
जरी येते ओठी तुझ्या माझ्यासाठी हसे,
नजरेत तुझ्या काही अनोळखी दिसे
तुझ्या जगातून बाबा हरवेल का ग ?
मोठेपणी बाबा तुला आठवेल का ग ?
सासुराला जाता-जाता उंबरठ्यामध्ये,
बाबासाठी येईल का पाणी डोळ्यांमध्ये ?

# डोळ्यांत सांजवेळी आणू

मंगेश पाडगावकर

डोळ्यांत सांजवेळी आणू नकोस पाणी
त्या दूरच्या दिव्यांना सांगू नको कहाणी

कामांत गुंतलेले असतील हात दोन्ही
तेव्हा नको म्हणू तू माझी उदास गाणी

वाटेवरी खुणेच्या शोधू नको फुले ती
ना ठेविते फुलांची माती इथे निशाणी

कळणार हाय नाही दुनिया तुला मला ही
मी पापण्यांत माझ्या ही झाकिली विराणी

# त्या फुलांच्या गंधकोषी

सूर्यकांत खांडेकर

त्या फुलांच्या गंधकोषी सांग तू आहेस का ?
त्या प्रकाशी तारकांच्या ओतिसी तू तेज का ?
त्या नभांच्या नीलरंगी होउनीया गीत का ?
गात वायूच्या स्वरांने सांग तू आहेस का ?

मानवाच्या अंतरीचा प्राण तू आहेस का ?
वादळाच्या सागराचे घोर ते तू रूप का ?
जीवनी या वर्षणारा तू कृपेचा मेघ का ?
आसमंती नाचणारी तू विजेची रेघ का ?

जीवनी संजीवनी तू, माउलीचे दूध का ?
कष्टणाऱ्या बांधवांच्या रंगसी नेत्रात का ?
मूर्त तू मानव्य का रे बालकांचे हास्य का ?
या इथे अन् त्या तिथे रे, सांग तू आहेस का ?

# पदरावरती जरतारीचा

ग. दि. माडगूळकर

पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा
आई मला नेसव शालू नवा

बांधिला सैलसर बुचडा मानेवरी
माळला सुरंगी गजरा ग त्यावरी
मोकळ्या बटा या रुळती भाळावरी
केसावरती लहर उठविली फिरवुन हळू कंगवा

डोळ्यांत रेखिले काजळ मऊ झोंबते
कानात घातले लोलक मी लोंबते
फिरफिरुनी माझी मी ऐन्याशी थांबते
गोऱ्या भाळी कोरून ल्याले पुनवेचा चांदवा

मज पहावयास येतील ग कोण ते ?
पाहिले काल पण नाव न मी जाणते
परि गुणास त्यांच्या नगरी वाखाणते
नुसती येता सई, उरी या घुमतो ग पारवा

# बिकट वाट वहिवाट नसावी

अनंत फंदी

बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडु नको
संसारामधि ऐस आपला, उगाच भटकत फिरू नको

चल सालसपण धरुनि निखालस, खोट्या बोला बोलु नको
अंगि नम्रता सदा असावी, राग कुणावर धरु नको
नास्तिकपणात शिरुन जनांचा बोल आपणा घेउ नको
भलीभलाई कर काही पण अधर्म मार्गी शिरू नको

मायबापावर रुसू नको
तू एकला बसू नको
व्यवहारामधे फसू नको
कधी रिकामा असू नको
परि उलाढाली भलत्यासलत्या पोटासाठी करू नको
संसारामधि ऐस आपला, उगाच भटकत फिरू नको

वर्म काढुनी शरमायाला उणे कुणाला बोलु नको

बुडवाया दुसऱ्याचा ठेवा, करुनी हेवा, झटु नको
मी मोठा शहाणा जगामधि गर्वभार हा वाहु नको
एकाहुनि एक चढि जगामधि थोरपणाला मिरवु नको

हिमायतीच्या बळे गरिबगुरिबाला तू गुरकावु नको
दो दिवसांची जाईल सत्ता, अपयश माथा घेउ नको
बहुत कर्जबाजारी होउनी ओज आपुला दवडू नको
स्नेह्यासाठी पदरमोड कर परंतु जामिन राहु नको

विडा पैजंचा उचलु नको
उणि तराजू तोलु नको
गहाण कुणाचे बुडवु नको
असल्यावर भिक मागू नको
नसल्यावर सांगणं कशाला, गाव तुझा, भिड धरु नको
कष्टाची बरि भाजिभाकरी तूपसाखरेची चोरी नको

दिली स्थिती देवानं तीतच मानी सुख, कधि विटु नको
आल्या अतिथ्या मुठभर द्याया मागं पुढती पाहु नको
उगिच निंदा स्तुती कुणाची स्वहितासाठी करू नको
बरी खुशामत शाहण्याचि ही, मूर्खाची ती मैत्रि नको

आता तुज ही गोष्ट सांगतो, सत्कर्मा ओसरू नको
असल्या गाठी धनसंचय कर, सत्कार्यी व्यय हटु नको

सुविचारा कातरु नको
सत्संगत अंतरू नको
द्वैताला अनुसरू नको
हरिभजनविण मरू नको
गावयास अनंत फंदीचे फटके मागे करू नको
सत्कीर्तिनं मतीचा डंका वाजे मग शंकाच नको

# गर्द सभोंती रानसाजणी

बालकवी

गर्द सभोंती रानसाजणी तू तर चाफेकळी
काय हरवले सांग शोधीसी या यमुनेच्या जळी ?

ती वनमाला म्हणे, "नृपाळा हे तर माझे घर.
पाहत बसते मी तर येथे जललहरी सुंदर."

"रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतील रमणी तुला
तू वनराणी दिसे भुवनी ना तुझिया रूपा तुला

अर्धस्मित तव मंद मोहने पसरे गालांवरी
भुलले तुजला हृदय साजणी ये चल माझ्या घरी"

# त्या तिथे पलिकडे तिकडे

ग. दि. माडगूळकर

त्या तिथे, पलिकडे, तिकडे
माझिया प्रियेचे झोपडे !

गवत उंच दाट दाट
वळत जाइ पायवाट
वळणावर अंब्याचे
झाड एक वाकडे

कौलावर गारवेल
वाऱ्यावर हळु डुलेल
गुलमोहर डोलता
स्वागत ते केवढे !

तिथेच वृत्ति गुंगल्या
चांदराति रंगल्या
कल्पनेत स्वर्ग जो
तिथे मनास सापडे

# झाल्या तिनी सांजा करुन

दादा कोंडके

झाल्या तिनी सांजा करुन सिणगार साजा
वाट पहाते मी ग येणार साजन माझा

प्रीतीच्या दरबारीचं येणार सरदार
मायेच्या मिठीचा त्यांच्या गळ्यात घालीन हार
दिलाच्या देव्हाऱ्यात बांधीन मी पूजा
वाट पहाते मी ग येणार साजन माझा

भेटीत रायाच्या सांगेन मी सारं
सोसवेना बाई मला यौवनाचा भार
तान्हेल्या हरणीला हळूच पाणी पाजा
वाट पहाते मी ग येणार साजन माझा

त्यांच्याच ओठांचा ओठी रंग लाल
आठवणीने त्यांच्या बाई रंगले हे गाल

धुंद व्हावी राणी, रंगून जावा राजा
वाट पहाते मी ग येणार साजन माझा

वाटतं सख्याचं वाजलं पाऊल
खट्याळ मनाला लागे खोटीच चाहूल
घालू कशी मी साद होईल गाजावाजा
वाट पहाते मी ग येणार साजन माझा

इचारच पडला बिचाऱ्या मनाला
येळ का ग व्हावा बाई सख्या सजनाला
बिलगुन बसावी शंभूला सारजा
वाट पहाते मी ग येणार साजन माझा

# तू तेंव्हा तशी

आरती प्रभू

तू तेंव्हा तशी, तू तेंव्हा अशी
तू बहरांच्या बाहूंची

तू ऐल राधा, तू पैल संध्या
चाफेकळी प्रेमाची

तू नवीजुनी, तू कधी कुणी
खारीच्या ग, डोळ्यांची

तू हिर्वी-कच्ची, तू पोक्त सच्ची
तू खट्टीमिठ्ठी ओठांची

# घट डोईवर घट कमरेवर

पी. सावळाराम

घट डोईवर घट कमरेवर
सोडी पदरा, नंदलाला, नंदलाला रे

कुणीतरी येईल अवचित पाहील
जाता जाता आगही लावील
सर्व सुखाच्या संसाराला, नंदलाला रे

हलता कलता, घट खिंदळता
लज्जेवरती पाणी उडता
नकोच होईन मीच मला, नंदलाला रे

केलीस खोडी, पुरे एवढी
जोवर हसते मनात गोडी
हसुनी तूही हो बाजूला, नंदलाला रे

# छेडियल्या तारा

शांता शेळके

छेडियल्या तारा
ते गीत येईना जुळून !
फुलते ना फूल तोच
जाय पाकळी गळून !

आकारून येत काहि
विरते निमिषांत तेहि
स्वप्नचित्र पुसुनि जाय
रंग रंग ओघळून !

क्षितिजाच्या पार दूर
मृगजळास येइ पूर
लसलसते अंकुर हे
येथ चालले जळून !

# गुंतता हृदय हे

वसंत कानेटकर

गुंतता हृदय हे कमलदलाच्या पाशी
हा प्रणयगंध परिमळे तुझ्या अंगाशी

या इथे जाहला संगम दो सरितांचा
प्राक्तनी आपुल्या योग तिथे प्रीतीचा
अद्‌वैत आपुले घडता या तीर्थाशी

दुर्दैवे आपण दुरावलो या देही
सहवास संपता, डागळले ऋण तेही
स्मर एकच तेव्हा सखये निज हृदयाशी

# झिणिझिणि वाजे बीन

- बा. भ. बोरकर

झिणिझिणि वाजे बीन
सख्या रे, अनुदिन चीज नवीन

कधि अर्थाविण सुभग तराणा
कधी मंत्रांचा भास दिवाणा
सूर सुना कधि केविलवाणा शरणागत अतिलीन

कधि खटका, कधि रुसवा लटका
छेडी कधि प्राणांतिक घटका
कधि जिवाचा तोडुन लचका घेते फिरत कठीण

सौभाग्ये या सुरांत तारा
त्यातुन अचपळ खेळे पारा
अलख निरंजन वाजविणारा सहजपणात प्रवीण

# गारवा वाऱ्यावर भिर भिर

सौमित्र

गारवा वाऱ्यावर भिर भिर भिर पारवा नवा नवा
प्रिये नभांत ही चांदवा नवा नवा

गवतात गाणे झुलते कधीचे
हिरवे किनारे हिरव्या नदीचे
पाण्यावर सर सर सर काजवा नवा नवा
प्रिये मनातही ताजवा नवा नवा

आकाश सारे माळून तारे
आता रुपेरी झालेत वारे
अंगभर थर थर थर नाचवा नवा नवा
प्रिये तुझा जसा गोडवा नवा नवा

# जपून चाल् पोरी जपून

मंगेश पाडगावकर

जपून चाल् पोरी जपून चाल्
बघणाऱ्या माणसाच्या जिवाचे हाल् !

लाडाने वळून बघायची खोड्
नाजूक नखऱ्याला नाही या तोड्
डोळ्यांत काजळ, गुलाबी गाल् !

केसांत सुरंगी रंगात ग
विजेची लवलव अंगात ग
खट्याळ पदराला आवर घाल् !

जिंकीत जिंकीत जातेस तू
ज्वानीचं गाणं हे गातेस तू
हासून होतेस लाजून लाल् !

ऊरात लागलेत नाचाया मोर्
कोणाच्या गळ्याला लागेल दोर् ?
माझ्या या काळजाचा चुकेल ताल् !

# गेले ते दिन गेले

भवानीशंकर पंडित

वेगवेगळी फुले उमलली रचुनि त्यांचे झेले
एकमेकांवरी उधळले
गेले, ते दिन गेले !

कदंब-तरूला बांधुन दोला उंच-खालती झोले
परस्परांनी दिले-घेतले
गेले, ते दिन गेले !

हरित-बिलोरी वेलबुटीवरी शीतरसांचे प्याले
अन्योन्यांनी किती झोकले
गेले, ते दिन गेले

निर्मलभावे नव देखावे भरुनी दोन्ही डोळे
तू मी मिळुनी रोज पाहिले
गेले, ते दिन गेले !

# तुला पाहिले मी नदीच्या

ग्रेस

तुला पाहिले मी नदीच्या किनारी
तुझे केस पाठीवरी मोकळे
इथे दाट छायांतुनी रंग गळतात
या वृक्षमाळेतले सावळे !

तुझी पावले गे धुक्याच्या महालात
ना वाजली ना कधी नादली
निळागर्द भासे नभाचा किनारा
न माझी मला अन् तुला सावली

मनावेगळी लाट व्यापे मनाला
जसा डोंगरी चंद्र हा मावळे
पुढे का उभी तू, तुझे दुःख झरते ?
जसे संचिताचे ऋतु कोवळे

अशी ओल जाता तुझ्या स्पंदनातून
आकांत माझ्या उरी केवढा
तमातूनही मंद ताऱ्याप्रमाणे
दिसे की तुझ्या बिल्वरांचा चुडा

# काळ्या गढीच्या जुन्या

ना. घ. देशपांडे

काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे
आलीस तू एकटी बांधुन सारे चुडे.

काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे
आलीस तू चोरटी बांधुन सारे चुडे.

वारा किती मंद ग ! होते किती कुंद ग !
होता किती धुंद ग अंधार मागेपुढे !

काळी निनावी भिती होती उभी भोवती
वाटेत होते किती काटेकुटे अन् खडे.

माझी तुझी चोरटी जेव्हा मिळाली मिठी
हुंकारले खालती आडातले पारवे.

हुंकारला पारवा तेजाळला काजवा !
हालून गेला जरा काळोख चोहिकडे !

# नभं उतरू आलं

शांता शेळके

नभं उतरू आलं, चिंब थरथर वलं
अंग झिम्माड झालं हिरव्या बहरात

अशा वलंस राती गळा शपथा येती
साता जल्मांची प्रीती, सरंल दिनरात

वल्या पान्यात पारा, एक गगन धरा
तसा तुझा उबारा, सोडून रीतभात

नगं लागंट बोलू, उभं आभाळ झेलू
गाठ बांधला शालू, तुझ्याच पदरात

# तू असतीस तर झाले असते

मंगेश पाडगावकर

तू असतीस तर झाले असते
गडे उन्हाचे गोड चांदणे
मोहरले असते मौनातून
एक दिवाणे नवथर गाणे

बकुळिच्या पुष्पांपरी नाजुक
फुलले असते गंधाने क्षण
अन् रंगांनी भरले असते
क्षितिजावरले खिन्न रितेपण

पसरियली असती छायांनी
चरणतळी मृदुशामल मखमल
अन् शुक्रांनी केले असते
स्वागत अपुले हसून मिष्किल

तू असतीस तर झाले असते
आहे त्याहुनी जग हे सुंदर
चांदण्यात विरघळले असते
गगन धरेतील धूसर अंतर

# रुणुझुणु रुणुझुणु रे

संत ज्ञानेश्वर

रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा ।
सांडीं तूं अवगुणु रे भ्रमरा ॥१॥

चरणकमळदळू रे भ्रमरा ।
भोगीं तूं निश्चळु रे भ्रमरा ॥२॥

सुमनसुगंधु रे भ्रमरा ।
परिमळु विद्‍गदु रे भ्रमरा ॥३॥

सौभाग्यसुंदरू रे भ्रमरा ।
बाप रखुमादेविवरू रे भ्रमरा ॥४॥

# उघड्या पुन्हा जहाल्या

उमाकांत काणेकर

उघड्या पुन्हा जहाल्या जखमा उरातल्या
फुलवी तुझ्या स्मृतींच्या कलिका मनातल्या

येऊ कशी निघोनी पाऊल अडखळे
विरहात वेचिताना घटना सुखातल्या

उठता तरंग देही हळुवार भावनांचे
स्मरतात त्या अजूनी भेटी वनातल्या

हासोनिया खुणावी ती रात रंगलेली
तू मोजिल्यास होत्या तारा नभांतल्या

# रेशमाच्या रेघांनी

शांता शेळके

रेशमाच्या रेघांनी, लालकाळ्या धाग्यांनी
कर्नाटकी कशिदा मी काढिला
हात नगा लावू माझ्या साडीला !

नवी कोरी साडी लाखमोलाची
भरली मी नक्षी फूलयेलाची
गुंफियलं राघूमोर, राघूमोर जोडीला
हात नगा लावू माझ्या साडीला !

जात होते वाटंनं मी तोऱ्यात
अवचित आला माझ्या होऱ्यात
तुम्ही माझ्या पदराचा शेव का हो ओढीला ?
हात नगा लावू माझ्या साडीला !

भीड काही ठेवा आल्यागेल्याची
मुरवत राखा दहा डोळ्यांची
काय म्हणू बाई बाई, तुमच्या या खोडीला
हात नगा लावू माझ्या साडीला !

# गेले द्यायचे राहून

आरती प्रभू

गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे
माझ्यापास आता कळ्या आणि थोडी ओली पाने

आलो होतो हासत मी काही श्वासांसाठी फक्त
दिवसांचे ओझे आता, रात्र रात्र शोषी रक्त

आता मनाचा दगड घेतो कण्हत उशाला
होते कळ्यांचे निर्माल्य आणि पानांचा पाचोळा

# उगवला चंद्र पुनवेचा

प्रल्हाद केशव अत्रे

उगवला चंद्र पुनवेचा !
मम हृदयी दरिया ! उसळला प्रीतिचा !

दाहि दिशा कशा खुलल्या
वनिवनी कुमुदिनी फुलल्या
नववधु अधिर मनी जाहल्या !
प्रणयरस हा चहुकडे ! वितळला स्वर्गिचा ?

# एक लाजरा न् साजरा

जगदीश खेबूडकर

एक लाजरा न् साजरा मुखडा, चंद्रावानी खुलला ग
राजा मदन हसतोय कसा कि जीव माझा भुलला ग
ह्या एकांताचा तुला इशारा कळला ग
लाज आडवी येती मला कि जिव माझा भुलला ग
नको रानी नको लाजू, लाजंमदी नको भिजू
हितं नको तितं जाऊ, आडोशाला उबं र्‍हाऊ
का? ............ बघत्यात !

रेशिम विळखा घालुन सजना नका हो कवळुन धरू
लुकलुक डोळं करुन भोळं बगतंय फुलपाखरू
कसा मिळावा पुन्हा साजनी मोका असला ग

डोळं रोखुन थोडं वाकुन झुकू नका हो फुडं
गटर्गुम गटर्गुम करून कबूतर बघतंय माज्याकडं
लई दिसानं सखे आज ह्यो धागा जुळला ग

बेजार झाले सोडा सजणा शिर्शिरी आली अंगा
मधाचा ठेवा लुटता लुटता बघतोय चावट भुंगा
मनात राणी तुझ्या कशाचा झोका झुलला ग ?

# अंदाज आरशाचा वाटे

ईलाही जमादार

वाचलेली, ऐकलेली, माणसे गेली कुठे ?
पुस्तकातून पाहिलेली माणसे गेली कुठे ?

रोज अत्याचार होतो आरशावरती आता,
आरशाला भावलेली माणसे गेली कुठे ?

अंदाज आरशाचा वाटे खरा असावा
बहुतेक माणसाचा तो चेहरा असावा

काठावरी उतरली स्वप्ने तहानलेली
डोळ्यांत वेदनेचा माझ्या झरा असावा

जखमा कशा सुगंधी झाल्यात काळजाला
केलेत वार ज्याने तो मोगरा असावा

माथ्यावरी नभाचे ओझे सदा "ईलाही'
दाही दिशा कशाच्या हा पिंजरा असावा

# कसे सरतील सये

संदीप खरे

कसे सरतील सये माझ्याविना दिसं तुझे ?
सरताना आणि सांग सलतील ना !
गुलाबाची फुलं दोन रोज राती डोळ्यांवर
मुसूमुसू पाणी सांग भरतील ना ! .....

पावसाच्या धारा धारा ..... मोजताना दिसं सारा
रिते रिते मन तुझे उरे .....
ओठभर हसे हसे..... उरातून वेडेपिसे
खोल खोल कोण आत झुरे ?
आता जरा अळिमिळी
तुझी माझी व्यथा निळी
सोसताना सुखावून हसशील ना ! .....

कोण तुझ्या सौधातून उभे असे सामसूम
चिडीचूप ..... सुनसान दिवा !
आता सांज ढळेलच आणि पुन्हा छळेलच
नभातून गोरा चांदवा !!
चांदण्याचे कोटी कण

आठवांचे ओले सण
रोज रोज नीजभर भरतील ना ! .....

इथे दूरदेशी माझ्या सुन्या खिडकीच्यापाशी
झडे सर ..... काचभर तडा !
तूच तूच ..... तुझ्या तुझ्या ..... तुझी तुझी ..... तुझे तुझे
सारा सारा तुझा तुझा सडा !! -
पडे माझ्या वाटेतून
आणि मग काट्यातून
जातानाही पायभर मखमल ना ! .....

आता नाही बोलायाचे ..... जरा जरा जगायाचे
माळुनिया अबोलीची फुले !
देहभर हलू देत ..... विजेवर झुलू देत
तुझ्या माझ्या विरहाचे झुले !!
जरा घन झुरू दे ना
वारा गुदमरू दे ना
तेव्हा नभ धरा सारी भिजवील ना ! .....

# चंद्र अर्धा राहिला रात्र

मधुकर जोशी

चंद्र अर्धा राहिला, रात्र अर्धी राहिली
भेट अर्धी, गीत अर्धे, प्रीत अर्धी राहिली

मोकळे बोलू कसे मी शब्द ओठी थांबले
लाजऱ्या डोळ्यांत माझ्या चित्र अर्धे रेखिले
ओठ अर्धे विलगले, अर्ध उकले पाकळी

बिलगुनी रमल्या तरूंशी पेंगलेल्या साउल्या
तो निळा एकांत तेथे भावना भारावल्या
धुंद झाल्या दशदिशा, रात्रही ओलावली

वाकले आकाश खाली दूरच्या क्षितिजावरी
चांदणे चुंबीत वारा झोपला वेलीवरी
भेट घ्याया सृष्टि ही अर्ध झुकली, वाकली

# त्या तरुतळी विसरले गीत

वा. रा. कांत

त्या तरुतळी विसरले गीत
हृदय रिकामे घेउनि फिरतो, इथे तिथे टेकीत

मुक्या मना मग भार भावना
स्वरातुनी चमकते वेदना
तप्त रणे तुडवीत हिंडतो, ती छाया आठवीत

विशाल तरू तरी फांदी लवली
थंडगार घनगर्द सावली
मनिंची अस्फुट स्मिते झळकती तसे कवडसे तीत

मदालसा तरुवरी रेलुनी
वाट बघे सखी अधिर लोचनी
पानजाळि सळसळे, वळे ती मथित हृदय कवळीत

पदर ढळे, कचपाश भुरभुरे
नव्या उभारित ऊर थरथरे
अधरी अमृत उतू जाय परि पदरी हृदय व्यथीत

उभी उभी ती तरुतळि शिणली
भ्रमणी मम तनु थकली गळली
एक गीत, परि चरण विखुरले, द्विधा हृदय-संगीत

# दिसते मजला सुखचित्र

शांता शेळके

दिसते मजला सुखचित्र नवे
मी संसार माझा रेखिते !

प्रीत तुझी-माझी फुलावी या फुलत्या वेलीपरी
भाव मुके ओठांत यावे गंध जसा सुमनांतरी
शब्दांविना मनभावना अवघ्याच मी तुज सांगते !

हात तुझा हाती असावा साथ तुझी जन्मांतरी
मी तुझिया मागून यावे आस ही माझ्या उरी
तुजसंगती क्षण रंगती निमिषात मी युग पाहते !

स्वर्ग मिळे धरणीस जेथे रंग नवे गगनांगणी
सप्तसुरां लेवून यावी रागिणी अनुरागिणी
तुझियासवे सुखवैभवे सौभाग्य हे नित् मागते !

# अंतरीच्या गूढ गर्भी

ना. घ. देशपांडे

अंतरीच्या गूढ गर्भी एकदा जे वाटले
एकदा जे वाटले ते, प्रेम आता आटले

दूर सोनेरी सुखाचे पाहिले आभास मी, तू
रंगले आभाळ पूर्वी, तेच आता फाटले

एकदा ज्यांतून मागे सूर संवादी निघाले
वंचनेने तोडले ते स्नेहतंतू आतले

शेवटी मंदावलेल्या वादळी वाऱ्याप्रमाणे
राहणे झाले दिवाणे, ते गीत गाणे कोठले

# बगळ्यांची माळ फुले

वा. रा. कांत

बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरात
भेट आपुली स्मरशी काय तू मनात ?

छेडिति पानात बीन थेंब पावसाचे
ओल्या रानात खुले ऊन अभ्रकाचे
मनकवडा घन घुमतो दूर डोंगरात.

त्या गाठी, त्या गोष्टी, नारळिच्या खाली
पौर्णिमाच तव नयनी भर दिवसा झाली !
रिमझिमते अमृत ते विकल अंतरात ?

हातांसह सोन्याची सांज गुंफताना
बगळ्यांचे शुभ्र कळे मिळुनि मोजताना
कमलापरी मिटति दिवस उमलुनी तळ्यात.

तू गेलिस तोडुनि ती माळ, सर्व धागे
फडफडणे पंखांचे शुभ्र उरे मागे
सलते ती तडफड का कधि तुझ्या उरात ?

# दिवस असे की कोणी माझा

संदीप खरे

दिवस असे की कोणी माझा नाही
अन् मी कोणाचा नाही .....

आकाशाच्या छत्रीखाली भिजतो
आयुष्यावर हसणे थुंकून देतो
या हसण्याचे कारण उमगत नाही
या हसणे म्हणवत नाही ! .....

प्रश्नांचे हे एकसंधसे तुकडे
त्यावर नाचे मनीचे अबलख घोडे
या घोड्याला लगाम शोधत आहे
परि मजला गवसत नाही .....

मी तुसडा की मी भगवा बैरागी ?
मद्यपि वा मी गांजेवाला जोगी ?
अस्तित्वाला हजार नावे देतो
परि नाव ठेववत नाही .....

मम म्हणताना आता हसतो थोडे
मिटून घेतो वस्तुस्थितीचे डोळे
या जगण्याला स्वप्नांचाही आता
मेघ पालवत नाही .....

# प्रिया आज माझी नसे

यशवंत देव

प्रिया आज माझी नसे साथ द्याया
नको धुंद वारे, नको चांदण्या या

नको पारिजाता धरा भुषवू ही
पदांची तिच्या आज चाहूल नाही
प्रियेविण आरास जाईल वाया

फुले सान झेलू तरी भार होतो
पुढे वाट साधी तरी तोल जातो
कुणाला कळाव्या मनाच्या व्यथा या

न शांती जिवाला, न प्राणास धीर
कसा आज कंठात येईल सूर
उरी वेदना मात्र जागेल गाया

अता आठविता तशा चांदराती
उरे मौक्तिकावीण शिंपाच हाती
उशाला उभी ती जुनी स्वप्नमाया

# रंगुनी रंगात साऱ्या

सुरेश भट

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा !
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा !

भोग जे येती कपाळी ते सुखाने भोगतो
अन् कळ्या झाल्या कधीच्या सोशिल्या ज्याच्या कळा

( कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा ! )

राहती माझ्यासवे ही आसवे गीतांपरी
हे कशाचे दुःख ज्याला लागला माझा लळा !

कोणत्या काळी कळेना मी जगाया लागलो
अन् कुठे आयुष्य गेले कापुनी माझा गळा !

सांगती 'तात्पर्य' माझे सारख्या खोट्या दिशा
"चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा !"

माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा !

# देवा मला रोज एक अपघात

संदीप खरे

देवा मला रोज एक अपघात कर
आणि तिच्या हातांनीच जखमा या भर !

कधीतरी कुठेतरी बसावी धडक
कळ मला यावी तिला कळावे तडक
घायाळाला मिळो एक घायाळ नजर !

अपघाती सोंग माझे वाटावे खरे
तिला येता प्रेम मला वाटावे बरे
दवा-दारूमध्ये कुठे असतो असर !

खरी व्यथा तेव्हा मग सांगेन तिला
विचारेल जेव्हा, "कुठे दुखते तुला ?"
जरा डावीकडे जरा पोटाच्या या वर !

टेकवता छातीवर डोके एकवार
ठोका घेई झोका उडे आभाळाच्या पार
व्यथांचाच काय ? पडे जगाचा विसर !

# तोच चंद्रमा नभात

- शांता शेळके

तोच चंद्रमा नभात तीच चैत्रयामिनी
एकांती मज समीप तीच तूहि कामिनी !

नीरवता ती तशीच धुंद तेच चांदणे
छायांनी रेखियले चित्र तेच देखणे
जाईचा कुंज तोच तीच गंधमोहिनी

सारे जरी ते तसेच धुंदी आज ती कुठे ?
मीहि तोच, तीच तूही, प्रीति आज ती कुठे ?
ती न आर्तता उरात स्वप्न ते न लोचनी

त्या पहिल्या प्रीतीच्या आज लोपल्या खुणा
वाळल्या फुलांत व्यर्थ गंध शोधतो पुन्हा
गीत ये न ते जुळून भंगल्या सुरांतुनी

# नकळत सारे घडले

रमेश अणावकर

नकळत सारे घडले
मी वळता पाउल अडले

ती पहिली क्षण ओझरती
परिचयात ओळख नुसती
संभाषण ओठांवरती, लाजण्यात राहुन गेले

नजरेला नजरेमधला
हसताना भाव उमगला
प्रीतिचा डावहि पहिला मी क्षणांत मोहुन हरले

सोन्याहुन अति मोलाचे
हे माझे गुपित मनीचे
मनि सुगंध उधळित नाचे, क्षण मलाच का हे नकळे

# थकले रे डोळे माझे

आ. रा. देशपांडे 'अनिल'

थकले रे डोळे माझे
वाट तुझी पाहता
वाट तुझी पाहता रे
रात्रंदिन जागता

सुकला रे कंठ माझा
तुज आळविता
तुज आळविता रे
नाम तुझे जपता

आटले रे अश्रु माझे
वाहता वाहता
वाहता वाहता रे
आठवणी काढता

शिणला रे जीव माझा
तुजविण राहता
तुजविण राहता रे
तुज नच भेटता

# तव नयनांचे दल हलले

बा. भ. बोरकर

तव नयनांचे दल हलले ग !
पानावरच्या दंवबिंदूपरी
त्रिभुवन हे डळमळले ग !

तारे गळले, वारे ढळले
दिग्गज पंचाननसे वळले
गिरि ढासळले, सूर कोसळले
ऋषि-मुनि-योगी चळले ग !

ऋतुचक्राचे आस उडाले
आभाळातुनि शब्द निघाले,
"आवर आवर अपुले भाले
मीन जळी तळमळले ग !"

हृदयी माझ्या चकमक झडली
नजर तुझी धरणीला भिडली
दो हृदयांची किमया घडली
पुनरपि जग सावरले ग

# राजा ललकारी अशी घे

जगदीश खेबूडकर

राजा ललकारी अशी घे
हाक दिली साद मला दे

कुंकवाचा माझा धनी, बळ वाघाचं आलंया
भरलेल्या मोटंवानी, मन भरून गेलंया
ओढ फुलाला वाऱ्याची, जशी खूण इशाऱ्याची
माझ्या सजनाला कळू दे

सूर भेटला सूराला, गानं आलं तालावर
खुळ्या आनंदाचं माझ्या, हासू तुझ्या गालावर
भरजरीचा हिरवा, शेला पांघरून नवा
शिवार हे सारं खुलू दे

थेंब नव्हं हे घामाचं, त्याचं बनतील मोती
घास देईल सुखाचा, लई मायाळू ही माती
न्याहारीच्या वखुताला, घडीभर इसाव्याला
सावली ही संग मिळू दे

# तरुण आहे रात्र अजुनी

सुरेश भट

तरुण आहे रात्र अजुनी राजसा निजलास का रे?
एवढ्यातच त्या कुशीवर तू असा वळलास का रे?

अजुनही विझल्या न गगनी तारकांच्या दीपमाला
अजुन मी विझले कुठे रे? हाय ! तू विझलास का रे?

सांग, ह्या कोजागिरीच्या चांदण्याला काय सांगू ?
उमलते अंगांग माझे, आणि तू मिटलास का रे?

बघ तुला पुसतोच आहे पश्चिमेचा गार वारा
रातराणीच्या फुलांचा गंध तू लुटलास का रे?

उसळती हृदयात माझ्या अमृताच्या धुंद लाटा
तू किनाऱ्यासारखा पण कोरडा उरलास का रे?

# जिवलगा कधि रे येशील तू

ग. दि. माडगूळकर

दिवसामागूनि दिवस चालले, ऋतू मागूनी ऋतू
जिवलगा, कधि रे येशील तू ?

धरेस भिजवून गेल्या धारा
फुलून जाईचा सुके फुलोरा
नभ धरणीसी जोडून गेले सप्तरंग सेतू !

शारदशोभा आली, गेली
रजनीगंधा फुलली, सुकली
चंद्रकलेसम वाढुन विरले अंतरीचे हेतू !

हेमंती तर नुरली हिरवळ
शिशिर करी या शरिरा दुर्बळ
पुन्हा वसंती डोलू लागे प्रेमांकित केतू !

पुनरपि ग्रीष्मी तीच काहीली
मेघावली नभि पुनरपि आली
पुनश्च वर्षा लागे अमृत विरहावर ओतू !

# ती गेली तेव्हा रिमझिम

ग्रेस

ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता
मेघांत अडकली किरणे हा सूर्य सोडवित होता

ती आई होती म्हणुनी घनव्याकुळ मीही रडलो
त्यावेळी वारा सावध पाचोळा उडवित होता

अंगणात गमले मजला संपले बालपण माझे
खिडकीवर धुरकट तेव्हा कंदील एकटा होता

# जे वेड मजला लागले

डॉ. वसंत अवसरे

जे वेड मजला लागले, तुजलाहि ते लागेल का ?
माझ्या मनीची ही व्यथा कोणी तुला सांगेल का ?

मी पाहतो स्वप्नी तुला, मी पाहतो जागेपणी
जे मी मुकेपणि बोलतो शब्दांत ते रंगेल का ?

हा खेळ घटकेचा तुझा घायाळ मी पण जाहलो
जे जागले माझ्या मनी चित्ती तुझ्या जागेल का ?

माझे मनोगत मी तुला केले निवेदन आज, गे
सर्वस्व मी तुज वाहिले तुजला कधी उमगेल का ?

# तिन्ही सांजा सखे मिळाल्या

भा. रा. तांबे

तिन्ही सांजा सखे मिळाल्या, देई वचन तुला
आजपासुनी जीवे अधिक तू माझ्या हृदयाला

कनकगोल हा मरीचिमाली जोडी जो सुयशा
चक्रवाल हे पवित्र, ये जी शांत गभीर निशा
त्रिलोक गामी मारुत, तैशा निर्मल दाहि दिशा
साक्षी ऐसे अमर करुनि हे तव कर करि धरिला

नाद जसा वेणूत, रस जसा सुंदर कवनांत
गंध जसा सुमनांत, रस जसा बघ या द्राक्षात
पाणी जसे मोत्यांत, मनोहर वर्ण सुवर्णात
हृदयी मी साठवी तुज तसा जीवित जो मजला

# जेव्हा तुझ्या बटांना उधळी

मंगेश पाडगावकर

जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा
माझा न राहतो मी हरवून हा किनारा

आभाळ भाळ होते, होती बटाहि पक्षी
ओढून जीव घेते पदरावरील नक्षी
लाटांस अंतरीच्या नाही मुळी निवारा

डोळे मिटून घेतो छळ हा तरी चुकेना
ही वेल चांदण्याची ओठांवरी झुकेना
देशील का कधी तू थोडा तरी इषारा ?

नशिबास हा फुलांचा का सांग वास येतो
हासून पाहिल्याचा नुसताच भास होतो
केव्हा तुझ्या खुषीचा उगवेल सांग तारा ?

# तुझे रूप राणी कुणासारखे

जगदीश खेबूडकर

तुझे रूप राणी, कुणासारखे ग ?
तुझे रूप राणी तुझ्यासारखे ग !

तुझा रेशमी केशसंभार काळा
जणू नागिणीचा दिसे धुंद चाळा
बटा दोन भाळावरी की जिभा त्या
तिच्या मस्तिला कोण रोधू शके ?

तुझे दोन डोळे शराबी शराबी
हसे लाज गाली गुलाबी गुलाबी
असे रूपलावण्य मी प्राशितो हे
मला लाभले ते तुला पारखे !

उभी अप्सरा चिंब न्हाऊन येथे
नजर फेकिता रिते बाण-भाते
विधाता करी काय हेवा तुझा गे
न्याहळून पाही तुला कौतुके !

# जांभुळपिकल्या झाडाखाली

ना. धों. महानोर

जांभुळपिकल्या झाडाखाली, ढोल कुनाचा वाजं जी
येंधळ येडं पाय कुनाचं, झिम्मा फुगडी झालं जी

समिंदराचं भरलं गानं, उधानवारं आलं जी
येड्यापिश्या भगतासाठी पुरतं लागिरं झालं जी

मोडुन गेल्या जुनाट वाटा, हा बोभाटा झाला जी
चोचीमंदी चोच टाकुनी, दाणं उष्टं झालं जी

जांभुळीच्या झाडाखाली, कोयडं बोल बोलं जी
जांभळीचं बन थोडं, पिकून पिवळं झालं जी

# चिंब भिजलेले

प्रवीण दवणे

या रिमझिम झिलमिल पाऊसधारा तनमन फुलवून जाती
सहवास तुझा मधुमास फुलांचा गंध सुखाचा हाती
हा धुंद गार वारा, हा कोवळा शहारा
उजळून रंग आले, स्वच्छंद प्रीतीचे
चिंब भिजलेले, रूप सजलेले
बरसुनी आले रंग प्रीतीचे

ओढ जागे राजसा रे अंतरी सूख बोले
सप्तरंगी पाखरू हे इंद्रधनू बघ आले
लाट ही वादळी मोहुनी गाते
ही मिठी लाडकी भोवरा होते
पडसाद भावनांचे, रे बंध ना कुणाचे
दाही दिशांत गाणे बेधुंद प्रीतीचे
चिंब भिजलेले, रूप सजलेले
बरसुनी आले रंग प्रीतीचे

हे फूल आले, पंख आले, रूप हे सुखाचे

रोमरोमी जागले दीप बघ स्वप्नांचे
बरसतो मोगरा थेंब गंधाचे
भर्जरी वेड हे ताल-छंदांचे
घन व्याकूळ रिमझिमणारा
मन-अंतर दरवळणारा
ही स्वर्गसुखाची दारे, हे गीत प्रीतीचे
चिंब भिजलेले, रूप सजलेले
बरसुनी आले रंग प्रीतीचे

# जाहल्या काही चुका

मंगेश पाडगावकर

जाहल्या काही चुका अन् सूर काही राहिले
तू दिलेले गीत माझे आवडीने गायिले

चांदण्यांच्या मोहराने रात्र केव्हा दाटली
काजळी काळ्या ढगांनी हाक केव्हा घातली
मी स्वरांच्या लोचनांनी विश्‍व सारे पाहिले

सौख्य माझे, दु:ख माझे, सर्व माझ्या भावना
मोर स्वप्नांचे निळे अन् विंधणार्‍या वेदना
मी असे गीतांतुनी सर्वस्व माझे वाहिले

संपता पूजा स्वरांची हात तू देशील का ?
दाटुनी काळोख येता तू घरी नेशील का ?
पूर्णतेसाठीच या मी सर्व काही साहिले

# चांदण्यात फिरताना माझा

सुरेश भट

चांदण्यात फिरताना माझा धरलास हात !
सखया रे, आवर ही सावर ही चांदरात !

निजलेल्या गावातुन आले मी एकटीच
दूर दिवे कळलावे पडले मागे कधीच
ह्या इथल्या तरुछाया पण सारे जाणतात !

सांग कशी तुजविनाच पार करू पुनवपूर ?
तुज वारा छळवादी अन्‌ हे तारे फितूर !
श्वास तुझा मालकंस ! स्पर्श तुझा पारिजात !

# ती येते आणिक जाते

आरती प्रभू

ती येते आणिक जाते
येताना कधि कळ्या आणिते
अन् जाताना फुले मागते.

येणे-जाणे, देणे-घेणे
असते गाणे जे न कधी ती म्हणते.

येताना कधि अशी लाजते
तर जाताना ती लाजविते
कळते काही उगीच तीही,
नकळत काही पाही बाही,
अर्थावाचून उगीच 'नाही', 'नाही' म्हणते.

येतानाची कसली रीत
गुणगुणते ती संध्यागीत
जाताना कधि फिरून येत,
जाण्यासाठिच दुरुन येत,
विचित्र येते, विरून जाते जी ही सलते.

# जाईन विचारित रानफुला

शांता शेळके

जाईन विचारित रानफुला
भेटेल तिथे ग सजण मला !

भग्न शिवालय परिसर निर्जन
पळसतरुंचे दाट पुढे बन
तरुवेली करतिल गर्द झुला

उंच पुकारिल मोर काननी
निळ्या ढगांतुन भरेल पाणी
लहरेल विजेची सोनसळा

वाहत येइल पूर अनावर
बुडतिल वाटा आणि जुने घर
जाईल बुडुन हा प्राण खुळा

# चंद्र आहे साक्षिला

जगदीश खेबूडकर

पान जागे फूल जागे, भाव नयनी जागला
चंद्र आहे साक्षिला, चंद्र आहे साक्षिला !

चांदण्याचा गंध आला पौर्णिमेच्या रात्रिला
चंद्र आहे साक्षिला, चंद्र आहे साक्षिला !

स्पर्श हा रेशमी, हा शहारा बोलतो
सूर हा, ताल हा, जीव वेडा डोलतो
रातराणीच्या फुलांनी देह माझा चुंबिला !

लाजरा, बावरा, हा मुखाचा चंद्रमा
अंग का चोरिसी दो जिवांच्या संगमा
आज प्रीतीने सुखाचा मार्ग माझा शिंपिला !

# तुझ्याचसाठी कितीदा

ना. घ. देशपांडे

तुझ्याचसाठी कितीदा..... तुझ्याचसाठी रे
मी दुहेरी बांधल्या खूणगाठी रे

मी दुपारी सोसले ऊन माथी रे !
तुझ्याचसाठी रे
मी दुहेरी बांधल्या खूणगाठी रे

लाविल्या मी मंदिरी सांजवाती रे
कैक आल्या, संपल्या, चांदराती रे !
तुझ्याचसाठी कितीदा

मी जगाच्या सोडिल्या रीतभाती रे !
तुझ्याचसाठी रे
मी दुहेरी बांधल्या खूणगाठी रे

# जिथे सागरा धरणी मिळते

पी. सावळाराम

जिथे सागरा धरणी मिळते
तिथे तुझी मी वाट पाहते

डोंगर दरिचे सोडून घर ते
पल्लव पाचूचे तोडून नाते
हर्षाचा जल्लोष करुनी जेथे प्रीत नदीची एकरुपते

वेचित वाळूत शंख शिंपले
रम्य बाल्य ते जिथे खेळले
खेळाचा उल्हास रंगात येउनी धुंदीत यौवन जिथे डोलते

बघुनी नभीची चंद्रकोर ती
सागर हृदयी उर्मी उठती
सुखदुःखाची जेथे सारखी प्रीतजीवना ओढ लागते

# चांदण्या रात्रीतले ते

शांता शेळके

चांदण्या रात्रीतले ते स्वप्न तू विसरून जा
मी कधी होते तुझी ते सर्व तू विसरून जा !

आणिले धागे तुझे तू मीहि माझे आणिले
गुंफिला जो गोफ त्याचा पीळ तू विसरून जा !

मी दिली वचने तुला अन् वाहिल्या शपथा खुळ्या
शब्द केवळ ते तयांचा अर्थ तू विसरून जा !

प्रीतिचे हितगूज ते, कुजबुज ती, रुसवेहि ते
ते हसू अन् आंसवे ती, आज तू विसरून जा !

चंद्र ज्याला साक्ष होता, जे फुलांनी पाहिले
रेखिले प्राणांत जे मी तेच तू विसरुन जा !

# मन सुद्ध तुझं गोस्त

शांताराम आठवले

मन सुद्ध तुझं गोस्त हाये पृथिविमोलाची
तू चाल पुढं तुला रं गड्या भीती कशाची
पर्वा बी कुनाची

झेंडा भल्या कामाचा जो घेउनि निघाला
काटंकुटं वाटंमंदी बोचति त्येला
रगत निगंल, तरि बि हंसल, शाबास त्येची

जो वळखितसे औक्ष म्हंजी मोटि लडाई
अन् हत्याराचं फुलावानी घाव बि खाई
गळ्यामंदी पडंल त्येच्या माळ इजयाची

# चाफा बोलेना

कवि ’बी

चाफा बोलेना, चाफा चालेना
चाफा खंत करी, काही केल्या फुलेना

गेले 'आंब्याच्या' बनी
म्हंटली मैनेसवे गाणी
आम्ही गळ्यांत गळे मिळवून रे

गेले केतकीच्या बनी
गंध दरवळला वनी
नागासवे गळाले देहभान रे

चल ये रे, ये रे गड्या
नाचु, उडू घालु फुगड्या
खेळु झिम्मा झिम् पोरी झिम् पोरी झिम्

हे विश्वाचे अंगण

आम्हा दिले आहे आंदण
उणे करू आपण दोघेजण रे

जन विषयाचे किडे
यांची धाव बाह्याकडे
आपण करू शुद्ध रसपान रे

चाफा फुली आला फुलून
तेजी दिशा गेल्या आटुन
कोण मी - चाफा ? कोठे दोघे जण रे ?

# जाळीमंदी पिकली करवंद

ग. दि. माडगूळकर

भर उन्हात बसली धरून सावली गुरं
न्हाई चिंता त्यांची तिन्हीसांज पातुरं
चला दोघं मिळुनी चढू टेकडीवर
चढता चढता धरा हात की वाट नसे रुंद
जाळीमंदी पिकली करवंद

तुम्ही बाळपासून जिवांचं लई मैतर
ही तरुणपणातील बाळपणाची लहर
कुणी बघत नाही तो चला गडे लवकर
आंबट गोडी चाखू वाटते पुरवा की छंद
जाळीमंदी पिकली करवंद

मज लाज वाटते सांगायाची धनी
घ्या तुमचं तुम्ही जरा तरी समजुनी
अहो, पाळणा उद्याचा हलतो माझ्या मनी
दऱ्या टेकड्या चला धुंडुया होऊनी बेबंद
जाळीमंदी पिकली करवंद

# मराठी असे आमुची

माधव ज्यूलियन

मराठी असे आमुची मायबोली जरी आज ही राजभाषा नसे
नसो आज ऐश्वर्य या माउलीला यशाची पुढें दिव्य आशा असे

जरी पंचखंडांतही मान्यता घे स्वसत्ताबळें श्रीमती इंग्रजी
मराठी भिकारीण झाली तरीही कुशीचा तिच्या, तीस केवीं त्यजी

जरी मान्यता आज हिंदीस देई उदेलें नवें राष्ट्र हें हिंदवी
मनाचे मराठे मराठीस ध्याती हिची जाणुनी योग्यता थोरवी

मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्नधर्मानुयायी असूं
पुरी बाणली बंधुता अंतरंगी, हिच्या एक ताटात आम्ही बसूं

हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं वसे आमुच्या मात्र हृन्मंदिरी
जगन्मान्यता हीस अर्पूं प्रतापे हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं

मराठी असे आमुची मायबोली अहो पारतंत्र्यात ही खंगली
हिची थोर संपत्ति गेली उपेक्षेमुळें खोल कालार्णवाच्या तळीं

तरी सिंधु मंथूनि काढूनि रत्नें नियोजूं तयांना हिच्या मंडणी
नको रीण, देवोत देतील तेव्हा जगांतील भाषा हिला खंडणी

# चंद्र होता साक्षीला

जगदीश खेबूडकर

सूर गेले दूर आता, शब्द मागे राहिला
चंद्र होता साक्षीला, चंद्र होता साक्षीला

पाहिले, भेटलो, बोललो प्रीतिने
पौर्णिमा लाजली, हासले चांदणे
प्राण हे छेडुनी राग मी गाइला

भावना अंतरी, वेदना जागली
प्रीत मी पाहिली, रीत मी साहिली
थांबली आसवें, हुंदका थांबला

चंद्र तो, रात्र ती, श्वास तो मोकळा
आज ते संपले शून्य मी एकला
त्याग मी भोगिता स्नेह का भंगला

# मल्मली तारुण्य माझे तू

सुरेश भट

मल्मली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे !
मोकळ्या केसात माझ्या तू जिवाला गुंतवावे !

लागुनी थंडी गुलाबी शिर्शिरी यावी अशी, की
राजसा, माझ्यात तू अन् मी तुझ्यामाजी भिनावे !

तापल्या माझ्या तनूची तार झंकारून जावी
रेशमी संगीत स्पर्शाचे पुन्हा तू पेटवावे !

रे ! तुला बाहूत माझ्या रूपगंधा जाग यावी
मी तुला जागे करावे ! तू मला बिलगून जावे !

# माजे रानी माजे मोगा

शांता शेळके

माजे रानी, माजे मोगा
तुजे दोल्यांत सोधता ठाव !

माजे राजा, माजे मोगा
तुजे नावाक जोडता नाव

फुलाफुलांक पुशीत आयलो
तुजे माजे प्रीतिचो गाव

काळ्या काळ्या दोळ्यांन् तुज्या
माज्या वाटा वाटा मेळतात माका

गोऱ्या गोऱ्या रंगांन तुज्या
माज्या दोळ्यांक चांदन्या राती

तुज्या छातीर ठेवता माथा
फुलाभाशेन भाशेन हलकी दुखा
तुजे पायाक रुतता काटा
माजे काळजाक लागता घाव !

तुज्या ओठांर सपना माजी
माजे गाणे गाणे होऊन येती
तुजे भितुर माजे मना
दऱ्यावैल्या किरणांचो भाव

# धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना

जगदीश खेबूडकर

धुंदी कळ्यांना, धुंदी फुलांना
शब्दरूप आले मुक्या भावनांना

तुझ्या जीवनी नीतिची जाग आली
माळरानि या प्रीतिची बाग झाली
सुटे आज माझ्या सुखाचा उखाणा

तुझा शब्द की थेंब हा अमृताचा
तुझा स्पर्श की हात हा चांदण्याचा
उगा लाजण्याचा किती हा बहाणा

चिरंजीव होई कथा मीलनाची
तृषा वाढते तृप्त या लोचनांची
युगांचे मिळावे रूप या क्षणांना

# भातुकलीच्या खेळामधली

मंगेश पाडगावकर

भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी

राजा वदला, "मला समजली, शब्दावाचुन भाषा
माझ्या नशिबासवे बोलती तुझ्या हातच्या रेषा"
का राणीच्या डोळां तेव्हा दाटुनि आले पाणी ?

राणी वदली बघत एकटक दूरदूरचा तारा
"उद्या पहाटे दुसऱ्या वाटा, दुज्या गावचा वारा"
पण राजाला उशिरा कळली गूढ अटळ ही वाणी

तिला विचारी राजा, "का हे जीव असे जोडावे ?
का दैवाने फुलण्याआधी, फूल असे तोडावे ?"
या प्रश्नाला उत्तर नव्हते, राणी केविलवाणी

का राणीने मिटले डोळे दूर दूर जाताना ?
का राजाचा श्वास कोंडला गीत तिचे गाताना ?
वाऱ्यावरती विरून गेली एक उदास विराणी

# माझिया प्रियाला प्रीत

उमाकांत काणेकर

माझिया प्रियाला प्रीत कळेना
अनुराग त्याचा माझा, हाय रे जुळेना

पावसात भिजतो श्रावण, सुखाचा महिना
आवरू मनाला कैसे मला ते जमेना
मुकी नेत्रभाषा त्याला कळूनी वळेना

यौवनात सुकते काया, दुःख आवरेना
वेदना उरीची छेडी मुक्या भावनांना
स्पर्श गोड अजुनी त्याचा सुखाचा मिळेना

वसंतात नाही बोले, श्रावणात नाही
कठोरास माझ्या मनिचे कळेनाच काही
रात रात शिणती डोळे, पापणी ढळेना

# भेट तुझी माझी स्मरते

मंगेश पाडगावकर

भेट तुझी माझी स्मरते अजुन त्या दिसाची
धुंद वादळाची होती रात्र पावसाची

कुठे दिवा नव्हता, गगनी एक ही न तारा
आंधळ्या तमातुन वाहे आंधळाच वारा
तुला मुळी नव्हती बाधा भीतीच्या विषाची

क्षुद्र लौकिकाची खोटी झुगारून नीती
नावगाव टाकुन आली अशी तुझी प्रीती
तुला मुळी जाणिव नव्हती तुझ्या साहसाची

केस चिंब ओले होते, थेंब तुझ्या गाली
ओठांवर माझ्या त्यांची किती फुले झाली
श्वासांनी लिहिली गाथा प्रीतिच्या रसाची

सुगंधीच हळव्या शपथा, सुगंधीच श्वास
स्वप्नातच स्वप्न दिसावे तसे सर्व भास
सुखालाहि भोवळ आली मधुर सुवासाची

# मधु मागशी माझ्या

भा. रा. तांबे

मधु मागशी माझ्या सख्या परि
मधुघटचि रिकामे पडती घरी !

आजवरी कमळाच्या द्रोणी
मधु पाजिला तुला भरोनी
सेवा ही पूर्विची स्मरोनी
करी न रोष सख्या, दया करी.

नैवेद्याची एकच वाटी
अता दुधाची माझ्या गाठी
देवपुजेस्तव ही कोरांटी
बाळगी अंगणी कशी तरी.

तरुण-तरुणिंची सलज्ज कुजबुज
वृक्षझऱ्यांचे गूढ मधुर गुज
संसाराचे मर्म हवे तुज
मधु पिळण्या परि बळ न करी !

ढळला रे ढळला दिन सखया !
संध्याछाया भिवविति हृदया
आता मधुचे नाव का सया ?
लागले नेत्र हे पैलतिरी.

# भोगले जे दुःख त्याला

सुरेश भट

भोगले जे दुःख त्याला सुख म्हणावे लागले !
एवढे मी भोगिले की मज हसावे लागले !

ठेविले आजन्म डोळे आपुले मी कोरडे
पण दुज्यांच्या आसवांनी मज भिजावे लागले !

लोक भेटायास आले काढत्या पायांसवे
अन् अखेरी कुशल माझे मज पुसावे लागले !

गवसला नाहीच मजला चेहरा माझा कधी
मी कशी होते मलाही आठवावे लागले !

एकदा केव्हातरी मी वचन कवितेला दिले
राखरांगोळीस माझ्या गुणगुणावे लागले !

# मन उधाण वाऱ्याचे

गुरु ठाकूर

मायेच्या हळव्या स्पर्शाने खुलते,
नात्यांच्या बंधात धुंद मोहरते
मन उधाण वाऱ्याचे, गूज पावसाचे,
का होते बेभान, कसे गहिवरते !

आकाशी स्वप्नांच्या हरपून भान शिरते,
हुरहुरत्या सांजेला कधी एकटेच झुरते
सावरते, बावरते, घडते, अडखळते का पडते ?
कधी आशेच्या हिंदोळ्यावर मन हे वेडे झुलते
मन तरंग होऊन पाण्यावरती फिरते
अन् क्षणात फिरुनी आभाळाला भिडते !
मन उधाण वाऱ्याचे, गूज पावसाचे,
का होते बेभान, कसे गहिवरते !

रुणझुणते, गुणगुणते, कधी गुंतते, हरवते,
कधी गहिऱ्या डोळ्यांच्या डोहात पार बुडते
तळमळते सारखे बापडे नकळत का भरकटते ?

कधी मोहाच्या चार क्षणांना मन हे वेडे भुलते !
जाणते जरी हे पुन्हा पुन्हा का चुकते ?
भाबडे तरी भासांच्या मागून पळते !
मन उधाण वाऱ्याचे, गूज पावसाचे,
का होते बेभान, कसे गहिवरते !

# पप्पा सांगा कुणाचे

शांता शेळके

ल ल्ला लला ललला, ल ल्ला लला ललला

पप्पा सांगा कुणाचे ? पप्पा माझ्या मम्मीचे !
मम्मी सांगा कुणाची ? मम्मी माझ्या पप्पांची !

इवल्या इवल्या घरट्यात, चिमणा चिमणी राहतात
चिमणा-चिमणी अन् भवती, चिमणी पिल्लेही चिवचिवती !

आभाळ झेलते पंखांवरी, पप्पांना घरटे प्रिय भारी
चोचीत चोचीने घास द्यावा, पिल्लांचा हळूच पापा घ्यावा !

पंखाशी पंख हे जुळताना, चोचीत चोचही मिळताना
हासते नाचते घर सारे, हासते छप्पर, भिंती, दारे !

# मन वढाय वढाय

बहिणाबाई चौधरी

मन वढाय वढाय
उभ्या पीकातलं ढोर
किती हाकला हाकला
फिरी येतं पिकांवर

मन मोकाट मोकाट
याच्या ठाई ठाई वाटा
जशा वाऱ्यानं चालल्या
पाऱ्यावर्हल्या रे लाटा

मन लहरी लहरी
त्याले हाती धरे कोन ?
उंडारलं उंडारलं
जसं वारा वहादनं

मन पाखरू पाखरू
याची काय सांगू मात ?

आता व्हतं भुईवर
गेलं गेलं आभायात

मन जहयरी जहयरी
याचं न्यारं रे तंतर
अरे, इचू, साप बरा
त्याले उतारे मंतर !

मन चपय चपय
त्याले नही जरा धीर
तठे व्हयीसनी ईज
आलं आलं धर्तीवर

मन एवढं एवढं
जसा खाकसंचा दाना

मन केवढं केवढं ?
आभायात बी मायेना

देवा, कसं देलं मन
आसं नही दुनियांत !
आसा कसा रे तू योगी
काय तुझी करामत !

देवा आसं कसं मन ?
आसं कसं रे घडलं ?
कुठे जागेपनी तूले
असं सपनं पडलं !

# नदीकिनारी नदीकिनारी ग

ना. घ. देशपांडे

नदीकिनारी, नदीकिनारी, नदीकिनारी ग !

दुसरे तिसरे नव्हते कोणी
तुझेच हसले डोळे दोन्ही
अवखळ बिजली भरली माझ्या उरात सारी ग !

जरा निळ्या अन्‌ जरा काजळी
ढगात होती सांज पांगली
ढवळी ढवळी वर बगळ्यांची संथ भरारी ग !

सळसळली ग, हिरवी साडी
तिनेच केली तुझी चहाडी
फडफडल्या पदराच्या पिवळ्या-लाल किनारी ग !

वहात होते पिसाट वारे
तशात मी उडविले फवारे
खुलून दिसली तुझ्या उराची नवी थरारी ग !

कुजबुजली भवताली राने
रात्र म्हणाली चंचल गाणे
गुडघाभर पाण्यात दिवाणे दोन फरारी ग !

# नाच रे मोरा अंब्याच्या

ग. दि. माडगूळकर

नाच रे मोरा, अंब्याच्या बनात
नाच रे मोरा नाच !

ढगांशि वारा झुंजला रे
काळा काळा कापूस पिंजला रे
आता तुझी पाळी, वीज देते टाळी
फुलव पिसारा नाच !

झरझर धार झरली रे
झाडांचि भिजली इरली रे
पावसात न्हाऊ, काहितरि गाऊ
करुन पुकारा नाच !

थेंबथेंब तळ्यात नाचती रे
टपटप पानांत वाजती रे
पावसाच्या रेघांत, खेळ खेळु दोघांत
निळ्या सौंगड्या नाच !

पावसाचि रिमझिम थांबली रे
तुझि माझि जोडी जमली रे
आभाळात छान छान, सात रंगी कमान
कमानीखाली त्या नाच !

# नाविका रे वारा वाहे रे

अशोकजी परांजपे

नाविका रे, वारा वाहे रे, डौलाने हाक जरा आज नाव रे
सांजवेळ झाली आता पैल माझे गाव रे

आषाढाचे दिसं गेले, श्रावणाचा मास सरे, भादवा आला
माझा राऊ मनामंदी बोलुनि गेला
धाव घेई बघ माझे मन, नाही त्याला ठाव रे

नवा साज ल्यायले मी, गौरीवाणी सजले मी, चांदवा ल्याला
माझा जीवू उरामंदी फुलुनी आला
नाचते रे बघ माझे तन, संग त्याच्या भाव रे

# निळासावळा नाथ

गंगाधर महांबरे

निळासावळा नाथ, तशीही निळी सावळी रात
कोडे पडते तुला शोधिता कृष्णा अंधारात

तुडवूनि वन, धुंडुनी नंदनवन
शोधुनि झाले अवघे त्रिभुवन
एक न उरले गोपीचे घर हाकेच्या टप्प्यात

नील जळी यमुनेच्या साची
होडि सोडिली मी देहाची
गवसलास ना परि तू कान्हा लाटांच्या रासांत

# धुंद आज डोळे

जगदीश खेबूडकर

धुंद आज डोळे हवा धुंद झाली
गाली तुझ्या ग कशी लाज आली ?

जसा सोनचाफा तुझी गौर कांती
नको सावरू ग तुझे केस हाती
डौल पारव्याचा तुझ्या मस्त चाली
बंडखोर वारा तुला शीळ घाली !

नको दूर जाऊ सखी थांब थोडी
किनाऱ्यास भेटे अशी लाट वेडी
तुझी पापणी का झुके आज खाली ?
घडी मीलनाची तुषारांत न्हाली !

तुझ्या यौवनाचा फुलावा पिसारा
फुटावा कळीला दंवाचा शहारा
हवे ते मिळाले अशा रम्य काली
नवी रूपराणी नवा साज ल्याली

# नववधू प्रिया मी

भा. रा. तांबे

नववधू प्रिया मी, बावरते
लाजते, पुढे सरते, फिरते

कळे मला तू प्राण-सखा जरि
कळे तूच आधार सुखा जरि
तुजवाचुनि संसार फुका जरि
मन जवळ यावया गांगरते

मला येथला लागला लळा
सासरि निघता दाटतो गळा
बागबगीचा, येथला मळा
सोडिता कसे मन चरचरते !

जीव मनीचा मनी तळमळे
वाटे बंधन करुनि मोकळे
पळत निघावे तुजजवळ पळे
परि काय करू ? उरि भरभरते

अता तूच भय-लाज हरि रे !
धीर देउनी ने नवरी रे
भरोत भरतिल नेत्र जरी रे !
कळ पळभर मात्र ! खरे घर ते !

# धुंदित गंधित होवुनि

शांताराम नांदगावकर

धुंदित, गंधित, होवुनि सजणा
प्रीतित रंगुनि जावु या
छेडित ये प्रीत-संगीत सजणा
प्रीतित रंगुनि जावु या
ये सजणा !

कुंजात या गंधलेली फुले माळुनि जाई झुले
गंधात ही धुंद झाली चमेली गुलमोहराला भुले
तुझी सखी तुझ्या सवे ही !

पानांतुनी रेशमी चांदणे हे मोहूनी येई करी
गाण्यातले सूर हे अमृताचे दाटुनी आले उरी
अशी घडी युगायुगाची !

# धुंद मधुमती रात रे

ग. दि. माडगूळकर

धुंद मधुमती रात रे, नाथ रे,
तनमन नाचे, यौवन नाचे
उगवला रजनीचा, नाथ रे

जल लहरी या धीट धावती
हरित तटांचे ओठ चुंबिती
येइ प्रियकरा, येइ मंदिरा
अलि रमले कमलात रे, नाथ रे

ये रे ये का मग दूर उभा ?
ही घटिकाहि निसटुनी जायची
फुलतील लाखो तारा,
परि ही रात कधि कधि ना यायची
चषक सुधेचा ओठी लावुनि,
कटीभंवती धरि हात रे, नाथ रे

# या चिमण्यांनो परत फिरा रे

ग. दि. माडगूळकर

या चिमण्यांनो परत फिरा रे, घराकडे अपुल्या
जाहल्या तिन्हीसांजा जाहल्या

दहा दिशांनी येईल आता अंधाराला पूर
अशा अवेळी असू नका रे आईपासुन दूर
चुकचुक करिते पाल उगाच चिंता मज लागल्या

इथे जवळच्या टेकडीवरती, आहो आम्ही आई
अजून आहे उजेड इकडे, दिवसहि सरला नाही
शेळ्या, मेंढ्या अजुन कुठे ग, तळाकडे उतरल्या

अवतीभवती असल्यावाचुन कोलाहल तुमचा
उरक न होतो आम्हां आमुच्या कधिही कामाचा
या बाळांनो, या रे लौकर, वाटा अंधारल्या

# पाऊस कधीचा पडतो

ग्रेस

पाऊस कधीचा पडतो झाडांची हलती पाने
हलकेच जाग मज आली दु:खाच्या मंद सुराने.

डोळ्यांत उतरते पाणी, पाण्यावर डोळे फिरती
रक्ताचा उडला पारा..... या नितळ उतरणीवरती.

पेटून कशी उजळेना ही शुभ्र फुलांची ज्वाला ?
ताऱ्यांच्या प्रहरापाशी पाऊस असा कोसळला.

संदिग्ध घरांच्या ओळी, आकाश ढवळतो वारा
माझ्याच किनाऱ्यावरती लाटांचा आज पहारा !

# दोन घडीचा डाव

शांताराम आठवले

दोन घडीचा डाव
त्याला जीवन ऐसे नाव

जगताचे हे सुरेख अंगण
खेळ खेळु या सारे आपण
रंक आणखी राव

माळ यशाची हासत घालू
हासत हासत तसेच झेलू
पराजयाचे घाव

मनासारखा मिळे सौंगडी
खेळाला मग अवीट गोडी
दुःखाला नच वाव

# पिवळी पिवळी हळद लागली

मधुकर जोशी

पिवळी पिवळी हळद लागली भरला हिरवा चुडा
वधु लाजरी झालीस तू ग सांगे तो चौघडा !

बाजुबंद त्या गोठ-पाटल्या बिलवर नक्षीदार
तुझ्या हृदी ग कुणी छेडिली रतिवीणेची तार
सांग कुणी ग अंगठीत या तांबुस दिधला खडा !

मुंडावळि या भाळी दिसती काजळ नयनांगणी
करकमळापरी कुणी गुंफिले सुवासिनीचे मणी
आठवणींचा घेउन जा तू माहेराचा घडा !

स्वप्नफुलांसह रमत रहा तू प्रेमळ संसारी
भाग्यवेल ती मोहरेल ग उद्या तुझ्या दारी
सौख्य पाहता भिजु दे माझ्या डोळ्यांच्या या कडा !

# दिल्याघेतल्या वचनांची

मंगेश पाडगावकर

दिल्याघेतल्या वचनांची शपथ तुला आहे
मनातल्या मोरपिसाची शपथ तुला आहे

बकुळीच्या झाडाखाली निळ्या चांदण्यात
हृदयाची ओळख पटली सुगंधी क्षणात
त्या सगळ्या बकुळफुलांची शपथ तुला आहे

शुभ्र फुले रेखित रचिला चांद तू जुईचा
म्हणालीस, "चंद्रोत्सव हा सावळ्या भुईचा !"
फुलांतल्या त्या चंद्राची शपथ तुला आहे

भुरभुरता पाउस होता सोनिया उन्हात
गवतातुन चालत होतो मोहुनी मनात
चुकलेल्या त्या वाटेची शपथ तुला आहे

हळूहळू काजळताना सांज ही सुरंगी
तुझे भास दाटुनि येती असे अंतरंगी
या उदास आभाळाची शपथ तुला आहे

# प्रतिमा उरी धरोनी

दत्ता वि केसकर

प्रतिमा उरी धरोनी मी प्रीतिगीत गावे

ते गीत प्रीतिचे रे हळूवार मी म्हणावे
अस्फूट भावनांच्या स्वप्नात गुंग व्हावे

पुष्पात गंध जैसा, गीतात भाव तैसा
अद्‌वैत प्रीतिचे हे मम जीवनी असावे

तू सप्तरंग धनुचे, स्वर सात बासरीचे
संगीत जीवनाचे अळवीत मी बसावे

का रोहिणीस वाटे चंद्रासवे असावे
हे भावस्वप्न अपुरे साकार तू करावे

# तू जपून टाक पाऊल जरा

बाळ कोल्हटकर

जीवन सुखदु:खाची जाळी, त्यात लटकले मानव कोळी
एकाने दुसऱ्यास गिळावे, हाच जगाचा न्याय खरा,
हीच जगाची परंपरा !

तू जपून टाक पाऊल जरा, जीवनातल्या मुशाफिरा ॥

पापपुण्य जें करशिल जगतीं, चित्रगुप्त मागेल पावतीं
पापाइतुकें माप ओतुनी, जे केले ते तसें भरा ॥

निरोप जेव्हा येईल वरचा, तेव्हा होशिल सर्वांघरचा
तोंवर तूं या रिपु जगाचा, चुकवुनि मुख दे तोंड जरा ॥

दानव जगति मानव झाला, देवाचाही दगड बनविला
कोण कोठला तूं तर पामर, चुकून तुझा करतील चुरा ॥

# पहाटे पहाटे मला जाग

सुरेश भट

पहाटे पहाटे मला जाग आली
तुझी रेशमाची मिठी सैल झाली !

मला आठवेना, तुला आठवेना
कशी रात्र गेली कुणाला कळेना
तरीही नभाला पुरेशी न लाली !

गडे हे बहाणे, निमित्ते कशाला ?
असा राहू दे हात माझा उशाला
मऊमोकळे केस हे सोड गाली !

तुला आण त्या वेचल्या तारकांची
तुला आण त्या जागणाऱ्या फुलांची
लपेटून घे तू मला भोवताली !

# चंद्र आहे साक्षिला

जगदिश खेबुडकर

पान जागे फूल जागे, भाव नयनी जागला
चंद्र आहे साक्षिला, चंद्र आहे साक्षिला !

चांदण्याचा गंध आला पौर्णिमेच्या रात्रिला
चंद्र आहे साक्षिला, चंद्र आहे साक्षिला !

स्पर्श हा रेशमी, हा शहारा बोलतो
सूर हा, ताल हा, जीव वेडा डोलतो
रातराणीच्या फुलांनी देह माझा चुंबिला !

लाजरा, बावरा, हा मुखाचा चंद्रमा
अंग का चोरिसी दो जिवांच्या संगमा
आज प्रीतीने सुखाचा मार्ग माझा शिंपिला !

# मन तळ्यात मळ्यात

संदीप खरे

मन तळ्यात, मळ्यात,
जाईच्या कळ्यांत

मन नाजुकशी मोतीमाळ,
तुझ्या नाजुकशा गळ्यात

ऊरी चाहुलींचे मृगजळ
वाजे पाचोळा उगी तशात

इथे वाऱ्याला सांगतो गाणी, माझे राणी
आणि झुळुक तुझ्या मनात

भिडू लागे रात अंगालागी
तुझ्या नखाची कोर नभात

माझ्या नयनी नक्षत्र तारा
आणि चांद तुझ्या डोळ्यांत

# चांदणे शिंपीत जाशी

राजा बढे

चांदणे शिंपीत जाशी चालता तू चंचले
ओंजळी उधळीत मोती हासरी ताराफुले

वाहती आकाशगंगा की कटीची मेखला
तेज:पुंजाची झळाळी तार पदरा गुंफीले

गुंतविले जीव हे मंजीर की पायी तुझ्या
जे तुझ्या तालावरी, बोलावरी, नादावले

गे निळावंती कशाला झाकिसी काया तुझी ?
पाहु दे मेघांविण सौंदर्य तुझे मोकळे

# दयाघना का तुटले

सुधीर मोघे

दयाघना,
का तुटले चिमणे घरटे ?
उरलो बंदी असा मी !

अरे, जन्म बंदिवास
सजा इथे प्रत्येकास
चुके ना कुणास
आता बंदी तुझा मी
दयाघना !

दहा दिशांची कोठडी
मोह-माया झाली वेडी
प्राण माझे ओढी
झालो बंदी असा मी
दयाघना !

बालपण उतू गेले
अन् तारुण्य नासले
वार्धक्य साचले
उरलो बंदी पुन्हा मी
दयाघना !

# मन पिसाट माझे अडले रे

- ना. घ. देशपांडे

मन पिसाट माझे अडले रे,
थांब जरासा !

वनगान रान गुणगुणले
दूरात दिवे मिणमिणले
मधुजाल तमाने विणले रे,
थांब जरासा !

ही खाली हिरवळ ओली
कुजबुजून बोलू बोली
तिमिराची मोजू खोली रे,
थांब जरासा !

नुसतेच असे हे फिरणे
नुसतेच दिवस हे भरणे
नुसतेच नको हुरहुरणे रे,
थांब जरासा !

# दाटून कंठ येतो

शांता शेळके

दाटून कंठ येतो ओठांत येइ गाणे
जा आपुल्या घरी तू, जा लाडके, सुखाने !

हातात बाळपोथी ओठांत बाळ भाषा
रमलो तुझ्यासवे मी गिरवीत श्रीगणेशा
वळवून अक्षरांना केले तुला शहाणे
जातो सुखावुनी मी त्या गोड आठवाने !

बोलांत बोबडीच्या संगीत जागवीले
लयतालसूरलेणे सहजीच लेववीले
एकेक सूर यावा नाहून अमृताने
अवघ्याच जीवनाचे व्हावे सुरेल गाणे !

घेऊ कसा निरोप ? तुटतात आत धागे
हा देह दूर जाता मन राहणार मागे !
धन आत्मजा दुजाचे ज्याचे तयास देणे
परक्यापरी अता मी येथे फिरून येणे

# राधा कृष्णावरी भाळली

पी. सावळाराम

राधा कृष्णावरी भाळली
गुजगुज उठली गोकुळी

अमृतवृक्षी फुलला मोहर
कोकिळकंठी फुटला सुस्वर
कुंजवानातून फुलाफुलांतून
नवलकथा दरवळली

वायूवेगे सुगंध वार्ता
कालिंदीच्या कानी पडता
हरिभक्तीची ओढ तियेची
नीलजळी थयथयली

अमरप्रीतिचे गीत लाघवी
हरि अधरीची वेणु वाजवी
राधामोहन बघण्या मीलन
इंद्रपुरी अवतरली

# दिवस तुझे हे फुलायचे

मंगेश पाडगावकर

दिवस तुझे हे फुलायचे
झोपाळ्यावाचून झुलायचे

स्वप्नांत गुंगत जाणे
वाटेत भेटते गाणे
गाण्यात हृदय झुरायचे

मोजावी नभाची खोली
घालावी शपथ ओली
श्वासांत चांदणे भरायचे

थरारे कोवळी तार
सोसेना सुरांचा भार
फुलांनी जखमी करायचे

माझ्या या घरच्यापाशी
थांब तू गडे जराशी
पापण्या मिटून भुलायचे

# ई साहित्य प्रतिष्ठान

रेशिम गाणी चे पुढील भाग लवकरच येत आहेत.
आपल्या मित्रमंडळींचे मेल आय डी कळवा.
त्यांनाही सर्व भाग पाठवू.

दोनहजार तिनशे वर्षांहून जुनी मराठी भाषा.

अजून हजारो वर्षं चालतच राहील.

तिच्या या वाटचालीत आपलाही खारीचा वाटा उचलू.

मित्रांचे/नातेवाईकांचे मेल आय डी कळवण्यासाठी :

esahity@gmail.com